## प्रकरण ५

## नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून येणारे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण


**5.1 प्रस्तावना ........ 308**

**5.1.1 जागतिक राजकारण, १९९० नंतरची भारतीय अर्थव्यवस्थेतील स्थित्यंतरे आणि जागतिकीकरणाची प्रक्रिया ........ 309**

**5.1.2 ग्राम, नगर, नागर संस्कृतीतून महानगरीकरणाच्या प्रक्रियेत खा-उ-जा संस्कृतीची भूमिका ........ 312**

**5.2 नव्वदोत्तरी गोमंतक व खा-उ-जा संस्कृती ........ 314**

**5.3 खा-उ-जा संस्कृती व साहित्य सहसंबंध ........ 318**

**5.4 निवडलेल्या नव्वदोत्तरी गोमंतकीय कथाकारांच्या कथेतून दिसून येणारे खा-उ-जा संस्कृतीचे पडसाद ........ 319**

**5.4.1 जागतिकीकरणामुळे शहरीकरणाच्या प्रक्रियेत असलेल्या गोमंतकाचे चित्रण ........ 319**

**5.4.2 खाण व्यवसायामुळे झालेल्या गोव्यातील बदलांचे चित्रण ........ 321**

**5.4.3 पर्यटनव्यवसायामुळे निर्माण झालेल्या गोव्यातील प्रश्नांचे चित्रण ........ 324**

**5.4.4 कसिनो संस्कृतीचे गोव्यातील समाजजीवनावर उमटलेले पडसाद ........ 331**

**5.4.5 जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या चंगळवादी संस्कृतीचे चित्रण ........ 332**

**5.4.6 सांस्कृतिक एकजिनसीकरणामुळे, पाश्चात्य संस्कृतीकडे ओढल्या जाणाऱ्या नवीन पिढी व जुन्या पिढीमधील संघर्षाचे चित्रण ........ 333**

**5.4.7 परदेशात कामानिमित्त गेलेल्या व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा भाग बनलेल्या गोवेकरांच्या व्यथा ........ 335**

**5.4.8 उदारीकरण व खाजगीकरणामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांचे चित्रण ........ 336**

**5.5 समारोप ........ 337**

**संदर्भ ........ 338**

## प्रकरण ५

# नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून येणारे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण

### 5.1 प्रस्तावना

१९९० च्या कालखंडात भारतातील आर्थिक धोरणात झालेल्या बदलांमुळे व त्यामुळे भारतात निर्माण झालेल्या जागतिकीकरणाच्या लाटेमुळे गावाची शहरे आणि शहरांची महानगरे निर्माण होऊ लागली. औद्योगिकीकरणामुळे स्थलांतरण बऱ्याच प्रमाणात होऊ लागल्याकारणाने शहरात लोकसंख्या वाढली त्याचप्रमाणे भारत हा भिन्न भाषिक आणि भिन्न सांस्कृतिक देश असला तरी सांस्कृतिक एकजिनसीपणा निर्माण होऊ लागला. औद्योगिकीकरण, भौतिक विकास, आधुनिकीकरण, बदलती शहरी संस्कृती, धावपळ याचा मानवी जीवनावर परिणाम होऊ लागला. शहरी गर्दी, गतीमानता, एकाकीपणा यामुळे मानवी नातेसंबंधात अनेक प्रश्न निर्माण होऊ लागले. नवमध्यमवर्ग निर्माण झाल्याने नवमध्यमवर्गाचे भावविश्व, त्यांचे प्रश्न समोर येऊ लागले. प्रगतीच्या नावाखाली जीवघेणी स्पर्धा वाढली. स्त्री शिक्षित होऊ लागली पण स्त्रियांच्या व्यथा काही संपल्या नाही. आधुनिक स्त्री नवीन आव्हानांना सामोरी जाऊ लागली. २१ व्या शतकात भारतात शहरीकरणाचा वेग झपाट्याने वाढू लागल्याकारणाने शहरी समस्याही वाढू लागल्या. दूषित पाणी, वाढता कचरा, अस्वच्छ आणि अतिप्रमाणात झोपडपट्ट्या निर्माण झाल्या. या वस्त्यांमध्ये आरोग्यविषयक अनेक समस्या भेडसावू लागल्या. दारिद्रय वाढले त्याचप्रमाणे गुन्हेगारी वृत्ती, जुगार अड्डे, खून, चोऱ्या, दरोडे, तस्करी, वेश्यागृहे, मद्यालये यातही वाढ झाली. स्वार्थ, सत्ता, संपत्तीच्या आणि प्रगतीच्या मार्गे धावता धावता अनेक नवीन प्रश्न डोकाऊ लागले. शहरीकरण म्हणजे सर्वसमावेशक प्रगतीची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक चालशक्ती असल्याचे मानले जाते. शहरीकरणामुळे निर्माण होणारी सर्वसमावेशक प्रगतशील संस्कृती आणि जहाल असे शहरी प्रश्न यामध्ये मोठी दरी निर्माण झाली. प्रगतीची व्याख्या शहरी प्रश्नांसाहित पुढे येऊ लागली. त्यामुळे प्रगती व प्रश्न यामध्ये संबंध प्रस्थापित करू न देणे हे आजच्या बदलत्या समाजजीवनापुढ्यात असलेले महत्त्वाचे आव्हान ठरले. हे आव्हान आजच्या नव्वदोत्तरी मराठी साहित्याच्या माध्यमातून अत्यंत चांगल्याप्रकारे टिपण्याचा प्रयत्न झालेला आहे.

### 5.1.1 जागतिक राजकारण, १९९० नंतरची भारतीय अर्थव्यवस्थेतील स्थित्यंतरे आणि जागतिकीकरणाची प्रक्रिया

खाजगीकरण व उदारीकरणाची परिणती म्हणून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला सुरूवात झाली असे म्हणता येईल. अर्थव्यवस्थेशी संलग्न असलेल्या खाजगीकरण व उदरीकरण या संज्ञा आर्थिक स्थरापुरत्या मर्यादित राहिल्या. पण जागतिकीकरण या संज्ञेची पाळेमुळे आर्थिक तसेच सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, वाङ्मयीन या सर्व क्षेत्रांत पसरलेली दिसून आली. खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या संज्ञांचा विचार करताना जागतिक स्थरावरील महासत्तांच्या राजकारणाचा विचार करणे गरजेचे ठरते. १९९० च्या दशकात रशियातील कम्युनिस्टांची सत्ता संपुष्टात आली. साम्यवादी विचारसरणीमुळे व राजकीय प्रक्रीयेमुळे जनतेच्या स्वप्नांचा अपेक्षाभंग झाला व एक महासत्ता लोप पाऊन अमेरिकेसारख्या, जगावर प्रभुत्व असलेल्या भांडवलवादी अशा प्रबळ सत्तेचा जन्म झाला. तंत्रज्ञानात निपुण, भारतीय उच्चशिक्षित तरुण वर्ग भरपूर पैसे कमावण्याच्या हेतूने अमेरिकेकडे ओढला जाऊ लागला. भारतीय बुद्धिमत्तेचा फायदा अमेरिकेने अर्थकारणाच्या बळकटीसाठी करून घेतला. अमेरिकेबरोबर या सत्तास्पर्धेच्या, प्रदर्शनाच्या घोडदौडेत चीन व जपान हे देशही सहभागी झाल्याने त्याचा परिणाम विकसनशील आणि अविकसित देशांच्या अर्थव्यवस्थांवर, समाजव्यवस्थांवर दिसून आला. चीनने आपल्या लोकसंख्येच्या बळावर स्वस्त वस्तू तयार करून 'मेड इन चायना' माल तयार करत जागतिक बाजारपेठ काबीज केले. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या संज्ञा रूढ होण्याचा हा नव्वदोत्तरी काळ होता. पण वसाहतवादामुळे इ. स. १६०० मध्ये मुळात जागतिकीकरणाची मुहूर्तमेढ रोवली गेली होती. याविषयी डॉ. रवींद्र शोभणे लिहितात, "विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात खाउजांचा उच्चार अधिक ठोसपणे होऊ लागला, असे दिसत असले, तरी ही प्रक्रिया रुजण्याची सुरूवात झाली तीच मुळी वसाहतवादी काळात. ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेनंतर (इ.स. १६००) भारतात व्यापाराच्या निमित्ताने पोर्तुगीज आणि इंग्रज यांनी पाऊल ठेवले, तिथूनच खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाची मुहूर्तमेढ रोवली गेली, हे नाकारता येत नाही." [1] परकीय सत्तेमुळे भारतीय समाज, सांस्कृतिक जीवनात क्रांती झाली त्याचबरोबर युरोपियन साहित्य वाचनाने साहित्यक्षेत्रावरही प्रभाव पडला. वसाहतवादी देशांनी वसाहती संपल्यानंतर समाजवादी विचारांनी भारावून समाजवादाचा आधार स्वीकारला. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी समाजवादाचा आधार घेतला. पण अमेरिका चीनसारखी भांडवलशाही राष्ट्रे आर्थिकदृष्ट्या बळकट होत गेली. जागतिक पार्श्वभूमीवर 'थर्ड वर्ल्ड कंट्रीस' म्हणजेच तिसऱ्या जगाची संकल्पना उदयास आली. मागासलेल्या आशिया,

आफ्रिका, लॅटीन अमेरिका, भारताचा समावेश असलेले दक्षिण आशियाई देश, तसेच तेल, पेट्रोलचचे उत्पादन करणाऱ्या देशांचा समावेश 'थर्ड वर्ल्ड कंट्रीस' अंतर्गत करण्यात आला. या देशांनी आपल्या प्रभुत्वाखाली वावरावे अशी अमेरिकेसारख्या भांडवलशाही देशांची इच्छा असल्याकारणाने अमेरिका-व्हिएतनाम, अमेरिका-इराण यांमध्ये युद्धे निर्माण झाली.

राजीव गांधीच्या मृत्युनंतर सत्तेवर आलेल्या कॉंग्रेस सरकारला आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले. भारतावर असलेल्या कर्जाची फेड व्हावी यासाठी वर्ल्ड बँक, आय.एम.एफ. सारख्या नामांकित संस्थांकडून कर्ज मिळविण्याच्या हेतूने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार भारताने केला. कर्ज मिळविण्यासाठी वर्ल्ड बँक, आय.एम.एफ. या संस्थांच्या अटी मान्य करून भारताने काही धोरणात्म बदल स्वीकारून भारतीय अर्थव्यवस्था विदेशी कपन्यांसाठी मुक्त केली.  तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव आणि अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांनी खुल्या अर्थव्यवस्थेचा आणि उदारीकरणाचा स्वीकार केला. व खाजगी क्षेत्रातील पैसा भारताच्या अर्थव्यवस्थेत आणण्याचा प्रयत्न केला. मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्याने बहुराष्ट्रीय कंपन्यांचे (MNC'S) आगमन भारतात झाले. अर्थव्यवस्थेतील या बदलांना आर्थिक सुधारणा म्हटले गेले. भारताची अर्थव्यवस्था सांभाळण्यास सरकारला बळगे प्राप्त झाले. खाजगी क्षेत्रांची आर्थिक वृद्धी झाली व सरकारला लाभ होऊ लागला. १९९० च्या सुमारास भारतात आलेल्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या लाटेमुळे भारतात जागतिकीकरणाची सुरूवात झाली. खाजगीकरण, उदारीकरण आणि एकूण जागतिकीकरणाची सुरूवात झाल्याने अर्थव्यवस्थेबरोबर समाज आणि सांस्कृतिक व्यवस्थेवर त्याचे पडसाद उमटले. खा-उ-जा संस्कृतीची चिन्हे सर्वत्र उमटू लागली.

इंदिरा गांधीने १९६६ ते १९७७ पर्यंत व पुनश्च १९८० ते १९८४ मध्ये झालेल्या त्यांच्या हत्येपर्यंत पंतप्रधानपद भूषविले. इंदिरा गांधीच्या काळात भारतात दूरदर्शन आले. दूरदर्शनचा इतिहास पाहिल्यास लक्षात येते की, ऑल इंडिया रेडिओचा एक भाग म्हणून नियमित दैनिक प्रसारणांची सुरूवात १९६५ मध्ये झाली. १९७५ पर्यंत भारतात फक्त ७ शहरांमध्ये टीव्ही सेवा होती. १९८५ नंतर घरोघरी दूरचित्रवाणी संच पोहोचले. त्यामुळे भारतीयांना घरबसल्या जगभरातील घडामोडींची महिती मिळू लागली व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला बळकटी प्राप्त झाली. १९५३ च्या दरम्यान संगणकाची ओळख भारताला झाली. संगणकीय तंत्रज्ञानाचा विकास होऊन जवाहरलाल नेहरूंच्या काळात १९६० मध्ये TIFRAC या नावाने संगणकाचे नामकरण करण्यात आले व १९६५ पर्यंत संगणक यंत्राला परिपूर्णता लाभली. दृकश्राव्य माध्यम व संगणकीय तंत्रज्ञानामुळे

जागतिकीकरणाच्या खुणा उमटू लागल्या. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला चार दशकांच्या आधी सुरूवात झाली पण या प्रक्रियेच्या मूर्त व गंभीर स्वरूपाचे पडसाद एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी उमटू लागले.

जागतिकीकरणाने भारतातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, वाङ्मयीन, धार्मिक, कृषी अशा अनेक क्षेत्रांचा ताबा घेतला. समाजमाध्यमे, इंटरनेट, संगणक युग, विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे जग व जगातील माणसांना या सर्व गोष्टींनी अधिक जवळ आणले व जागतिकीकरणाची प्रक्रिया अधिक तीव्र बनली. माध्यमांच्या वापरामुळे पाश्चात्य जीवनशैलीचा प्रभाव भारतीय जीवनशैलीवर पडत असल्याचे चित्र दिसून येते. भारतात आलेल्या व स्थिरावलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पादनाचे जाळे निर्माण करण्यास माध्यमे यशस्वी ठरलेली आहेत.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून इंग्रजी भाषेला जगभर प्राप्त झालेले महत्त्व व त्यात प्रादेशिक भाषांची होणारी गळचेपी याचा विचार करावा लागेल. इंग्रजी भाषेचा शिरकाव सहजपणे भारतीय भाषांमध्ये होऊ लागला. मराठी माणसानेही दैनंदिन जीवनात अनेक इंग्रजी शब्दांचा स्वीकार केला. प्रमाण व बोलीभाषेचे शुद्ध स्वरूप हरवून परकीय शब्दांचे अतिक्रमण झाले. दैनंदिन जीवनात तसेच शिक्षण क्षेत्रातही इंग्रजी भाषेला अनन्यसाधारण महत्त्व दिले गेल्याने अनेक भाषा, बोली मृतप्राय होत असल्याचे दिसून आले. शिक्षण क्षेत्रात खाजगीकरणाचा शिरकाव झाला. शैक्षणिक संस्थांना मिळणारे सरकारी अनुदान बंद झाल्याने वैद्यकीय, अभियांत्रिक, व्यवस्थापकीय शिक्षण देणाऱ्या खाजगी संस्था सुरू झाल्या व फीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून बक्कळ पैसे घेत लुबाडण्यात आले. मानवी मूल्यव्यवस्थेला हादरे पोहोचले. पबसंस्कृती निर्माण झाली, विवाहबाह्य संबंधातून निर्माण झालेले भावनाशून्य व शारीरिक आसक्तीने निर्माण झालेले संबंध या गोष्टींना शहरी, महानगरीय जीवनात महत्त्व प्राप्त झाले, उच्चशिक्षण प्राप्त झालेला तरुण वर्ग परदेशात बक्कळ पैसे कमावत त्रिकोणी-चौकोनी कुटुंब उभे करू लागला. आईवडिलांचे एक स्वप्न सकाराले गेले पण आईवडिलांच्या माथी वृद्धाश्रमांतील केविलवाणे आणि बेवारशी जगणे आले. भारतीय समाज एका नवीन वास्तवाला सामोरे जाऊ लागला. मध्यमवर्गीय, निम्नमध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय आणि उच्चभ्रू अशी समाजव्यवस्था निर्माण झाली.

जागतिकीकरणाने कृषिसंस्कृतीवर घाला घातला. SEZ (Special Economic Zone) नावाखाली गावातील पिकाऊ जमिनी आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या भकीस पडल्या व कृषिसंस्कृतीला गालबोट लागले. पर्यावरणीय व जागतिक तापमान वाढीच्या प्रश्नामुळे दुष्काळ, अतिवर्षण अशा स्थितीला शेतकरी वर्ग सामोरे

जात असल्याकारणाने शेतकऱ्यांच्या दु:खात भर पडत आहे. विदेशी बी-बियाणे, रासायनिक खाते इत्यादींमुळे शेतीला सत्वहीनता लाभून शेतकरी वर्ग अधिक फसल्याचे चित्र दिसू लागले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत माणूस एकाकी, आत्मकेंद्रीत बनत चालला आहे. माणसामाणसांमध्ये संवादाचा अभाव जाणवू लागला आहे. मोबाईल, समाजमाध्यमे इत्यादींमुळे नात्यांमधील संवाद तुटत चाललेला आहे. खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणामुळे भौतिक प्रगती साधलेली आहे. पण त्याचबरोबर सामाजिक परिवर्तने व मूल्यहीनतेमुळे अनेक प्रश्न निर्माण केलेले आहे. खा-उ-जा संस्कृती तयार होत त्या संस्कृतीचे बरे वाईट परिणाम समाजजीवनावर उमटत नव्या वास्तवाला आजचा समाज सामोरे जात असल्याचे दिसून येते.

### 5.1.2 ग्राम, नगर, नागर संस्कृतीतून महानगरीकरणाच्या प्रक्रियेत खा-उ-जा संस्कृतीची भूमिका

भारत हा कृषीकेंद्रीत असा भूप्रदेश. भारतातील कृषीकेंद्रीत समाज हा प्रामुख्याने ग्रामीण भागात विखुरलेला, ग्रामजीवन जगणारा दिसून येतो. ग्रामजीवनातील कृषीकेंद्रीत संस्कृती हे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणावे लागते. वैशिष्ट्यपूर्ण अशी समाजव्यवस्था, सांस्कृतिक जीवन, वैशिष्ट्यपूर्ण अशी ग्रामीण बोली हे ग्राम जीवनाचे महत्त्वाचे पैलू. ग्राम व्यवस्थेला अनागरी समाज व्यवस्था असेही म्हणता येईल. पारंपारिक रूढी संकेतांचा पगडा असलेली, मर्यादित लोकसंख्या असलेली, शेतीस प्राधान्य देणारी, पारंपारिक मूल्य, घराण्याची प्रतिष्ठा इ. गोष्टींना महत्त्व देणारी, स्त्रियांसाठी नोकरीच्या संधी अनुपलब्ध असलेली, बोली भाषेचे वर्चस्व असलेली, थोडी अविकसित, बहुसांस्कृतिक वातावरणाचा अभाव असलेली समाजव्यवस्था अशी ही ग्राम किंवा अनागरी समाजव्यवस्था. नव्वदोत्तरी कालखंडातील अर्थव्यवस्थेतील बदलांमुळे गावपातळीवर नोकरदार मध्यमवर्ग निर्माण झाला व त्यांच्या गरजा भागवण्यासाठी श्रमकरी वर्ग निर्माण झाला. खेड्यातील नोकरदार मध्यमवर्गीय मंडळी खेड्यातून तालुक्यात ये जा करू लागली. खेड्यातील मुले तालुक्यात शिक्षणासाठी व पुढे नोकरीसाठी शहरात स्थायिक झाली. खेड्यातील मजूरही जास्त पैसे कमावण्याच्या आशेने खेड्यातून तालुक्यात, शहरात ये जा करू लागल्याने शेतीसाठी मजूर मिळेनासे झाले. शेते पडीक पडू लागल्याने ग्रामजीवनाचा चेहरामोहरा बदलला. "आज महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, सुशिक्षित बेकारांच्या आत्महत्या, अंतर्गत पसरलेले सामाजिक, धार्मिक, राजकीय अस्वास्थ्य हे सगळें परिणाम जागतिकीकरणाची फलश्रुती आहे." [2] असे मत डॉ. रवींद्र शोभणे नोंदवतात.


ग्राम जीवनापासून नागर संस्कृतीकडे भारताची वाटचाल महत्त्वाची ठरते. प्राचीन काळातही भारतात नगरे होती. ही नगरे व्यापार – उद्योग, राजसत्ता, धर्मसत्ता इ. केंद्रे होती. विसाव्या शतकाच्या शेवटच्या तीन दशकात वैज्ञानिक प्रगती, तंत्रज्ञान आणि औद्योगिक क्रांती तसेच पाश्चात्य जगतातील प्रबोधनामुळे नगरे निर्माण झाली. शहरांचा, नगरांचा कायापालट झाला. भारतात झपाट्याने होणारे शहरीकरण म्हणजे सर्वसमावेशक प्रगतीची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक चालशक्ती असल्याचे मानले जाते. शहरीकरणामुळे शहरी समस्याही निर्माण झाल्या. खेड्यातून शहरात होणाऱ्या स्थलांतरामुळे दूषित पाणी, अतिप्रमाणात झोपड्या, रोगराईचा प्रसार, कचरा विल्हेवाटीचा प्रश्न, गुन्हेगारी, दारिद्रय असे अनेक प्रश्न वाढीस लागले.

पुढे शहरांची झपाट्याने होणारी क्षेत्रफळाची वाढ, वाढती लोकसंख्या, नोकरी धंद्याच्या, पोटापाण्याच्या निमित्ताने खेड्यातून शहरात होणारे स्थलांतर, मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्याने व बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन झाल्याने वाढलेली जीवघेणी स्पर्धा यामुळे २१ व्या शतकात शहरीकरणाचा वेग झपाट्याने वाढला. शहरांच्या झपाट्याने होणाऱ्या वाढीमुळे शहरांचे महानगरात रुपांतर झाले. ‘दिल्ली’, ‘मुंबई’, ‘चेन्नई’, ‘कोलकत्ता’, ‘बेंगळूरू’ या महानगरांमध्ये ‘पुणे’, ‘अहमदाबाद’, ‘सुरत’, ‘हैदराबाद’ या महानगरांचीही भर पडलेली आहे. चार दशलक्ष (4 Million) लोकसंख्या असलेल्या शहरांना ‘मेट्रोपोलीटन सिटी’ म्हणजेच ‘महानगरे’ संबोधले जाते. भारताने स्वीकारलेल्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणामुळे शहरीकरण व परिणता महानगरीकरणाच्या प्रक्रियेत जागतिकीकरणाचे पडसाद उमटू लागले. महानगरी जीवनात ताण तणाव, गर्दी, स्पर्धा, धावपळ, गतिमानता, संवादहीन एकाकी जीवन, गिरण्या, चाळी, हॉटेल, मॉल, वेश्यागृहे, जुगार अड्डे, तस्करी, खून, चोऱ्या, मारामाऱ्या इत्यादी समस्या वाढल्या. झोपडपट्ट्या मोठ्या संख्येने निर्माण झाल्या. श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिकानअधिक गरीब होऊ लागला. भौतिक सुविधा, गगनचुंबी इमारती, पक्के रस्ते आले. व्यक्तिस्वातंत्र्याला वाव मिळू लागले. चंगळवादी संस्कृतीचा प्रादुर्भाव झाला. सिनेमा, फॅशन, जाहिराती, हॉटेल यांचा जीवनशैलीवर प्रभाव पडला. अनेक भाषांच्या संकराने बहुभाषिक समाजव्यवस्था निर्माण झाली. संमिश्र संस्कृती निर्माण झाली. असुरक्षितता, अशांतता, नैसर्गिक आपत्ती या सर्वांची मुळे खाजगीकरण, उदारीकरण व परिणता जागतिकीकरणात आहेत.

### 5.2 नव्वदोत्तरी गोमंतक व खा-उ-जा संस्कृती

गोव्यात जागतिकीकरणाची सुरूवात व खऱ्या अर्थाने वेगळया संस्कृतीची, भाषेची ओळख १५ व्या शतकात पोर्तुगीजांच्या राजवटीत झाली. १९६१ नंतर गोवा मुक्त झाला व अनेक राजकीय, सामाजिक बदलांना गोमंतकीय समाज सामोरे गेला. मुक्तीनंतर १९९० नंतरच्या कालखंडात गोव्यात झपाट्याने बदल होऊ लागाले. खा-उ-जा संस्कृतीच्या प्रभावाने शहरीकरणाच्या प्रक्रियेत असलेल्या नव्वदोत्तरी गोव्याचे चित्र बदलले.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग म्हणून गोव्यातील पर्यटनाचा विचार करणे गरजेचे ठरेल. गोव्यावर असलेल्या जागतिकीकरणाच्या पडसादाचा विचार करत असताना गोव्यातील पर्यटन व्यवसायाचा विचार करावा लागतो. पर्यटनाचा गोव्यातील सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर तसेच पर्यावरणावर बराच प्रभाव पडलेला दिसून येतो. “tourism contributes approximately 34 per cent of the State Domestic Product, providing employment to nearly 30 per cent of the total workforce (Economic survey 2011- 12).”[3] २०११-१२ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार (इकॉनॉमिक्स सर्वे) राज्याच्या उत्पादनामध्ये म्हणजेच ‘स्टेट डोमेस्टिक प्रॉडक्ट’ मध्ये पर्यटनामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेत ३४% योगदान लाभते. तसेच ३० टक्के लोकांना पर्यटनामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. गोव्याच्या पर्यटनाचा विचार करत असताना १९७० च्या दरम्यानचा विचार करावा लागतो ज्यावेळी गोव्यातील समुद्रकिनाऱ्यावर ‘हीप्पी’ म्हणजेच विदेशी पर्यटक येऊ लागले. सुरूवातीला अत्यंत कमी प्रमाणात येणाऱ्या विदेशी पर्यटकांचा आकडा २००३ सालापासून वाढत गेला. २०.३ लाख देशी विदेशी पर्यटक गोव्यात आले जे त्यावेळच्या गोव्यातील लोकसंख्येपेक्षा जास्त होते. मागच्या पाच वर्षात म्हणजे २०१८ ते नोव्हेंबर २०२३ या काळात गोव्यात येणाऱ्या विदेशी पर्यटकांची संख्या लाखाच्या घरात पोहोचली. २०१८-१९ मध्ये लाखांच्या घरात असलेल्या विदेशी पर्यटकांच्या संख्येला २०२० – २१ मध्ये कोविडमुळे गळती लागली पण २०२२ मध्ये पुन्हा पर्यटनाला बळकटी देण्याचे प्रयत्न सरकारी यंत्रणेकडून सुरू झाले व विदेशी पर्यटकांची संख्या नोव्हेंबर २०२३ पर्यंत वाढत गेल्याचे आपल्याला राज्य पर्यटन विभागाच्या आधारे पर्यटन मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या खालील तक्त्यातून समजते.


Press Information Bureau
Government of India

About Us | Press Releases | Gallery | Research Unit | Media Facilitation | Archives | Fact Check Unit

Ministry of Tourism

4.03 lakh Foreign Tourist visits Goa during January-November 2023

Posted On: 05 FEB 2024 5:18PM by PIB Delhi

The details of Foreign Tourist Visits (FTVs) in the State of Goa during 2019-2022 is given below

| Year | FTVs (in Lakh) | Growth over previous year (%) |
|---|---|---|
| 2018 | 9.34 | - |
| 2019 | 9.37 | 0.32 |
| 2020 | 3.03 | -67.66 |
| 2021 | 0.22 | -92.74 |
| 2022 | 1.75 | 695.45 |
| 2023(Jan-Nov)* | 4.03 | 130.29 |

Source: State Tourism Department

[4] (भारत सरकारच्या प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोच्या संकेतस्थळावरून मिळविलेला तक्ता)

गोव्यात येणाऱ्या पर्यटकांमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला बळकटी प्राप्त होत असली तरी परिणामी गोमंतकातल्या समृद्ध अशा सांस्कृतिक लोकपरंपरा, लोकनृत्य, लोकगीते, सणसमारंभ यांची जागा पाश्चात्य पब नृत्य, पाश्चात संगीत, सनबर्न, रेव पार्टीस, कॅसीनो, वेश्या व्यवसाय, समुद्रकिनाऱ्यांवर होणारे शरीर प्रदर्शन इत्यादींनी घेतल्याने गोमंतकातील समृद्ध लोकपरंपरेची ओळख जगभर न पोहोचता गोव्याची प्रतिमा कलंकित होत जगभर पोहोचलेली दिसून येते. समुद्रकिनाऱ्या लगतच्या गावात पर्यटकांच्या निवासासाठी कोको हट्सना मागणी असल्याने समुद्रालगतच्या भागात राहणारे लोक परंपरागत व्यवसाय धंदे सोडून पर्यटनामुळे निर्माण होणाऱ्या नवीन व्यवसाय धंद्यांचा पर्याय स्वीकारताना दिसत आहेत. ड्रग विक्रेत्यांचा सुळसुळाट वाढत आहे. गोव्यात येणारे रशियन, इस्रायली, नायजेरियन ड्रग माफिया या व्यवहारात गुंतल्याचे चित्र दिसून येते. या संदर्भात

रेडीफ.कॉम या संकेतस्थळावर बातमी लेखन करणारे विकि नंजप्पा लिहितात, “There is plenty of work for the mules, the dealer says. Of all the drugs manufactured, 70 per cent is smuggled out while 30 per cent is sold at rave parties and tourists in Goa.” [5] त्यांच्या मते तयार होणाऱ्या ७० टक्के ड्रगमधून ७० टक्के स्मगलिंग केले जाते व ३० टक्के रेव्ह पार्ट्यांमध्ये व गोव्यात येणाऱ्या पर्यटकांपर्यंत पोहोचवले जाते. आपल्या एका लेखात ते लिहितात, “drug trade in Goa is worth Rs 6000 crore per year.” [6] म्हणजेच, गोव्यात दरवर्षी ६००० कोटी रुपयांचा अंमली पदार्थांचा व्यापार होतो. गोव्यात वास्तव्यास असलेल्या व पोलीस यंत्रणेला, सरकार दरबारी असलेल्या काही नेत्यांना हाती घेणाऱ्या रशियन माफियांकडून तसेच गोव्यात विसा अवैद्य असूनही मुक्तपणे संचार करणाऱ्या नायजेरियन नागरिकांकडून हा व्यापार बऱ्याच प्रमाणात अवैध्य पद्धतीने होतो.

पर्यटनाचा एक भाग म्हणून गोव्यात आलेल्या कॅसिनोसंस्कृतीचा विचार करावा लागतो. गोव्यात पर्यटनासाठी येणाऱ्या राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी कॅसिनो उदयास आले.

“William Britto, the first and only Goan to hold a casino license, was instrumental in persuading the state government led by Mr. Ravi Naik to amend The Public Gambling Act, 1976, in 1992 and for paving the way for the introduction of the first casino in Goa. Since 1992 when the first amendment came in to introduce vessel as places for gambling, a number of amendments have been made in the Goa Legislative Assembly in favour of casino industry till date.” [7]

कॅसिनोचा पहिला परवाना गोव्यातील विल्यम ब्रिट्टो यांना लाभला. श्री. रवी नाईक यांच्या नेतृत्वाखालील, १९७६ मधील सार्वजनिक जुगार कायद्याची, राज्य सरकारकडून १९९२ मध्ये सुधारणा करण्यास आली आणि पहिला कॅसिनो सुरू करण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला. गोव्यात १९९२ पासून जेव्हा जुगार कायद्यामध्ये पहिली दुरुस्ती करण्यात आली तेव्हापासून आजपर्यंत गोवा विधानसभेत कॅसिनो उद्योगाच्या बाजूने अनेक दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. कॅसिनोंकडे पर्यटकांना आकर्षित करण्याची क्षमता असल्याने आणि पर्यटनामुळे गोव्यातील तरुणांना नोकरी व्यवसायाच्या संधी मिळत असल्याकारणाने गोव्यातील सरकारनेही कॅसिनोंच्या वृद्धीसाठी शक्यतो प्रयत्न केले आहेत. १९८८ मध्ये राज्य सरकारने १९७६ मधील सार्वजनिक जुगार

कायद्यात सुधारणा करत किनाऱ्याजवळील कॅसिनोंना परवानगी देण्यात आली. २००७ मध्ये प्रतापसिंह राणेंच्या सरकारने पाच जणांना परवाने दिले. यादरम्यान लीला ग्रुपने साळ नदीत 'कॅसिनो रिओ' स्थापिला. पण नद्यातील गाळ संपुष्टात येत पर्यावरणास हानिकारक होत असल्याने तसेच पारंपारिक मासेमारी उद्योगाचा नाश होत असल्याने सासष्टी तालुक्यातील लोकांच्या विरोधामुळे या कॅसिनोचे मांडवी नदीत स्थलांतर करण्यात आले. कॉंग्रेस सरकार सत्तेत असताना भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी दिनांक २० में २००८ रोजी मांडवी नदीतील कॅसिनो हटवण्यासाठी निदर्शने केली. पण भाजप सत्तेत आल्यानंतर कॅसिनोंवर बंदी लादण्याऐवजी त्यांचे पुनर्वसन करण्यासाठीचे भाजप सरकारकडून प्रयत्न सुरू झाले. पण मासेमारीस व पर्यावरणास धोका असल्यामुळे स्थानिक पातळीवर व सामाजिक कार्यकर्त्यांकडून कॅसिनोंच्या पुनर्वसनास तीव्र विरोध दर्शविला गेला. २००२-२००७ या कालखंडात नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफी या संस्थेच्या माध्यमातून झालेल्या अभ्यासात कॅसिनोतील सांडपाणी मांडवी नदीत सोडण्यात येत असल्याने घातक जंतू तयार झाल्याने पाणी वापरास व पिण्यास अयोग्य असल्याचा अहवाल मांडला गेला. २०१४ – २०१५ सालात गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या अभ्यासात कॅसिनोंमुळे मांडवी नदीत 'कोलिफॉर्म बॅक्टेरिया' नावाचे घातक जंतू अतिप्रमाणात सापडल्याचे अभ्यासांती मांडण्यात आले. कॅसिनोमुळे गोव्यातील मूल्यव्यवस्थेला हादरे बसले. वेश्याव्यवसाय, ड्रग माफिया यांचा सुळसुळाट वाढला. कॅसिनोमुळे मांडवी नदीचे व पणजीचे चित्र पालटले. गोव्यात १९९० च्या दरम्यान खाण व्यवसायालाही बळकटी प्राप्त झालेली दिसून येते. चौगुले सारख्या कंपनीच्या माध्यमातून शंभर टक्के निर्यात करण्यास योग्य असलेला खनिज माल १९९३ पासून तयार होऊ लागला, त्यामुळे निश्चितच मोठ्या प्रमाणात खनिज निर्यातीचा हा कालखंड असल्याचे दिसून येते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग म्हणून या आयात निर्यातीचा तसेच पर्यटन व्यवसायाचा विचार करत गोमंतकीय कथेवर उमटलेल्या खाण व्यवसाय व पर्यटन व्यवसायाच्या पडसादाचा विचार करावा लागतो.

सेझ धोरणाचाही इथे विचार करणे गरजेचे ठरते. सेझ धोरणानुसार उद्योगधंदे, मोठमोठे कारखाने, पायाभूत सुविधा प्रस्थापित करण्यासाठी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ पाहत असलेल्या देशांमधील जमिनी कायदेशीररीत्या बळकावण्याचा प्रयत्न झाला. २००६-०७ मध्ये गोव्यात १५ सेझना मान्यता देण्यात आली. यापैकी सात जणांना २००७ पर्यंत भारत सरकारची औपचारिक मान्यता मिळाली; वेर्णा औद्योगिक वसाहतीमध्ये पाच, सांकवाळ औद्योगिक वसाहतीत एक आणि भूतखांब पठारावर एक. १९८० च्या सुमारास, गोवा औद्योगिक विकास महामंडळ (GIDC) ने नायलॉन 6,6 च्या उत्पादनासाठी भूतखांब, फोंडा येथे जमीन संपादित

केली होती. DuPont या अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनीने भारतीय व्यापारी समूह, थापर ग्रुपच्या सहकार्याने, ₹ ६ अब्जांच्या (₹१४० बिलियन किंवा २०२३ मध्ये US$१.७ बिलियनच्या समतुल्य) प्रकल्पाची सुरूवात केली होती. हेक्सामेथिलेनेडिअमिन आणि ॲडिपिक ॲसिड या दोन घातक रसायनांचा वापर करूनही हा प्रकल्प 'प्रदूषणमुक्त' म्हणून घोषित करण्यात आला. नंतर स्थानिकांना पर्यावरणीय धोक्यांची जाणीव झाल्यामुळे जलस्रोत आणि बागायती धोक्यात येऊ शकत असल्याने अनेक वर्षांसाठी दीर्घकाळ आंदोलन सुरू झाले. २३ जानेवारी १९९५ रोजी, सुमारे ७० आंदोलकांनी कारखान्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर आपले बस्तान मांडले. यात प्रामुख्याने स्त्रिया आणि मुलांचा सहभाग होता. तीन पोलिस जीपसह कंपनी प्रस्तापित करू पाहणाऱ्या अमेरिकन ड्यूपॉन्ट अधिकाऱ्यांना आंदोलकांनी कारखान्याकडे जाऊ देण्यास नकार दिल्यावर उपस्थित पोलिसांनी ड्युपॉन्टच्या अधिकाऱ्यांना पणजीत परत जाण्याचा सल्ला दिला. त्यांनी गोव्याचे तत्कालीन मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे यांची भेट घेतली आणि कार्यकर्त्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. दुपारी साडेचारच्या सुमारास गोवा पोलिसांनी आंदोलकांना पांगण्याची कोणतीही पूर्वसूचना न देता गोळीबार केला, एका महिलेला पोलिसांच्या अत्याचारापासून वाचवण्याच्या प्रयत्नात निलेश नाईक यांना छातीवर गोळी लागल्याने त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर, आंदोलकांनी सूडाची कृती म्हणून पोलिसांवर हल्ला केला. पुढे आंदोलक  कंपनीच्या कार्यालयाकडे निघाले आणि सर्वकाही जाळून टाकले. कंपनीने नंतर गोव्यातील आपला प्रस्ताव टाकून तामिळनाडू येथे स्थलांतरित केले. स्थानिकांकडून गोव्यात अधिकृतपणे जमिनी बळकाविण्याच्या या प्रक्रियेला विरोधही झाला. १५ जून २००९ सालात गोवा सरकारकडून SEZ म्हणजेच सेझ धोरण रद्दबातल करण्यात आले पण याचे पडसाद जनमानसावर उमटले. गोमंतकीय नव्वदोत्तरी कालखंडातील निसर्ग – मानव तर कधी मानव-मानवामधील या संघर्षाचे पडसाद नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेवर उमटले असल्याचे दिसून येते.

### 5.3 **खा-उ-जा संस्कृती व साहित्य सहसंबंध**

"वाङ्मयासह सर्व कला या सांस्कृतिक निर्मिती असतात. विशिष्ट संस्कृतीत जगणाऱ्या कलावंतांनी, या संस्कृतीने दिलेल्या सामग्रीतून त्याच संस्कृतीत जगणाऱ्या माणसांसाठी त्या निर्माण केलेल्या असतात. त्यामुळे ज्या संस्कृतीच्या त्या कला असतात त्या संस्कृतीचा घटक असणाऱ्या व्यक्तींना त्या कलांची अर्थपूर्णता अधिक प्रमाणात जाणवू शकते. अन्य संस्कृतीतील व्यक्तींपेक्षा त्या संस्कृतीतील व्यक्तींना त्या कलांचे सूक्ष्म व अनेकांगी आकलन होऊ शकते."[४] सुधीर रसाळ यांच्या मतांच्या अनुषंगाने विचार केल्यास लक्षात येते की सद्यकाल

जगणाऱ्या व खा-उ-जा संस्कृतीने निर्माण केलेल्या समाजजीवनातील चांगल्या वाईट गोष्टींना अनुभवणाऱ्या, प्रामुख्याने नव्वदोत्तरी कालखंडात लेखन करणाऱ्या लेखकांच्या साहित्यामध्ये खा-उ-जा संस्कृतीच्या खुणा उमटलेल्या आहेत.

खा-उ-जा संस्कृतीमुळे साहित्यातून आविष्कृत झालेले आशयविश्व असमानतेला नकार देणारा विद्रोही दलित समाज, बदलत्या ग्रामजीवनातील सामाजिक – सांस्कृतिक बदल, स्त्रीमुक्ती व स्त्रीस्वातंत्र्य या पातळ्यांवरच मर्यादित न राहता, जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली मॉल संस्कृती, कॉम्पुटर, इंटरनेट, फेसबुक, मोबाईल, पब्ज, टीव्ही, इंटरनेट अशा अत्यंत नव्या विश्वाला सामोरे गेल्याने, या विषयांशी निगडीत अनुभवविश्व तीव्र स्वरुपात साहित्यातून व्यक्त होऊ लागले आहे.

## 5.4 निवडलेल्या नव्वदोत्तरी गोमंतकीय कथाकारांच्या कथेतून दिसून येणारे खा-उ-जा संस्कृतीचे पडसाद

विठ्ठल ठाकूर, पु. शि. नार्वेकर, गजानन रायकर, चंद्रकांत गांवस, सू. म. तडकोड, ज्ञानेश्वर कोलवेकर, विठ्ठल गांवस, मिलिंद म्हामल, नारायण महाले, दयाराम पाडलोस्कर, गजानन देसाई, उदय नाईक या निवडक नव्वदोत्तरी कथाकारांचा विचार करत असताना, मुक्तीनंतरच्या गोमंतकातील सामाजिक बदलांचे चित्र पु. शि. नार्वेकर, गजानन रायकर, ज्ञानेश्वर कोलवेकर, विठ्ठल गांवस, मिलिंद म्हामल, नारायण महाले, दयाराम पाडलोस्कर, गजानन देसाई या कथाकारांच्या कथा लेखनातून दिसून येते. यातील ज्ञानेश्वर कोलवेकर, विठ्ठल गांवस, मिलिंद म्हामल, दयाराम पाडलोस्कर, गजानन देसाई या पाच कथाकारांच्या कथा लेखनात खा-उ-जा संस्कृतीचे पडसाद उमटलेले दिसून येतात.

### 5.4.1 जागतिकीकरणामुळे शहरीकरणाच्या प्रक्रियेत असलेल्या गोमंतकाचे चित्रण

बदलत्या गोमंतकात चंगळवादी संस्कृती फोफावत आहे. याचे चित्रण 'काळ बदलतो आहे' या कथेत विठ्ठल गांवस उत्तम पद्धतीने करतात. मुक्तिपूर्व काळातील गोव्याचे चित्रण करताना, मुक्तिपूर्व काळातील गोव्यात खाण व्यवसायाचे असलेले मर्यादित स्वरूप सांगत आज गोव्यात फाईव्ह स्टार हॉटेल, स्विमिंग पूल, रेस्टॉरंट्स, फॉरेन टुरिस्ट (परदेशी पर्यटक) वाढले. आजच्या काळात बदललेली गावे, आलेल्या सुखसुविधा, गावांचे झालेले शहरीकरण, वाढती लोकसंख्या व एकूण चंगळवादी संस्कृतीवर भाष्य करताना लेखक लिहितात, "कसा होता

आपला गाव...पन्नास साठ वर्षापूर्वी...सगळे रस्ते मातीचे होते. रस्त्यावर लाईट नव्हते. काही महत्त्वाच्या चौकावर जनरेटरच्या सहाय्याने पेटलेले दिवे दिसायचे, बाकी सगळीकडे काळोख...आजूबाजूला गावातून लोकांना घेऊन एक – दोन कार्रेर ये-जा करायच्या, तेव्हा सगळीकडे मातीचा धुरळा उडायचा. गाड्या फक्त दोघांकडे होत्या. एक आपल्याकडे आणि दुसरी रामकृष्णाकडे...खडबडीत रस्त्यावरून डुलत डुलत जेव्हा गाडी यायची तेव्हा आजूबाजूची माणसं कुतूहलाने पाहायची. मुक्तीनंतर सगळंच बदललं. सगळे मातीचे रस्ते डांबरी झाले. रस्त्यावर, घराघरातून वीज चमकू लागली. उद्योगधंदे वाढू लागले. त्यामुळे शेजारच्या प्रदेशातून, राज्यातून कामासाठी माणसं आली. पूर्वी गावातल्या मुख्य भागात ऐस पैस पसरलेली घरे होती. आता मुख्य भागातच नव्हे तर सभोवतालच्या डोंगर-टेकड्यांवर घरेच घरे दिसताहेत. आठ – दहा हजार लोकसंख्या असलेलं गाव आता दीड – दोन लाखाचा झाला. रस्ते गाड्यांनी भरून गेले.”[9] ग्रामीण आणि अधुनिकीकरण या दोहोंच्या सीमारेषा धुंडाळणारा गोमंतकीय समाज हा नव्वदोत्तरी गोमंतकीय साहित्यातून व्यक्त झालेला आहे. ‘कॅथरीन’ या कथेत लेखक विठ्ठल गांवस लिहितात, “केश्रू सगळो संसार सुधारलो पुण तुझो तो ताव्हेर्न सुधारलो ना. बाकीच्या ताव्हेर्नानी बियर आयली, व्हिस्की, रम, जीन फॉरीन ड्रींक आयले. खावापक ततया, चणे, बिकण दिवपाक लागले आणि तू आजून खारातले तोर दिता? असेच चलले जाल्यार एक दिस तुका हो ताव्हेर्न बंद करपाक पडतलो.”[10] जागतिकीकरणाची झाळ बसल्याने पारंपारिक व्यवसाय संपुष्टात आणण्याचा प्रयत्न होत आहे. ‘लिब्रूची इच्छा’ या कथेमध्ये हातात पैसे आल्यानंतर टेरेसचे घर बांधल्याने डुक्कर पाळण्यासाठी उभारलेले डुक्करांचे घर (घुड) मोडणारी मारीयान दिसून येते.

ज्ञानेश्वर कोलवेकर यांची ‘वाटचाल’ ही गोवा सोडून बेळगावला स्थायिक झालेल्या आणि कित्येक काळाने गोव्यात आल्यानंतर येथील बदलांचा साक्षीदार ठरलेल्या सदानंदाची कथा येते. गोव्यात आधी सगळीकडे कार्रेरी होत्या. आज स्कूटर असल्याने बसने प्रवास करणे कमीपणाचे समजणारे आपले चुलते त्याला दिसतात. मुंबईच्या वेगाशी स्पर्धा करणारा गोवा, एकेकाळी हिरवाईने नटलेली व आज तांबड्या मातीने माखलेली वनश्री, मराठी शाळांकडे पाठ फिरवून इंग्रजी शाळांकडे वळलेला गोमंतकीय अशा पद्धतीने शहरीकरणाच्या प्रक्रियेत असलेल्या बदलत्या गोव्यातील स्थितीचे वेध त्यांची कथा घेताना दिसून येते. गोवा भेटीत त्याला कित्येक वर्षांनी आपला शाळेतील बाबासॉ हा मित्र भेटतो. दोन ट्रक व एका टेम्पोचा मालक असलेला बाबासॉ टेम्पोचा परमीट मिळविण्यासाठी आज पैशांसोबत बाईही पुरवावी लागते हे सत्य सदानंदच्या पुढ्यात मांडतो. भ्रष्टाचार, गोव्यातील बदलती स्थिती व काम मिळविण्यासाठी स्वत:च्या बायकोलाही गहाण

ठेवणारी बळावलेली प्रवृत्ती व मूल्यऱ्हासांकडे चाललेली गोव्याची वाटचाल असे वास्तव 'वाटचाल' या कथेतून लेखक करतात. शहरीकरणामुळे ग्रामजीवनात झालेल्या स्थित्यंतरांचे चित्रण 'सोयरिक' या विठ्ठल गांवस यांच्या कथेतून येते. शाणुच्या मुलीला लग्नासाठी 'सोयरिक' येते पण ती वेळेत घरी न पोहोचल्याने गोंधळ निर्माण होतो. आपली मुलगी 'शिंदळकी' व्यवसायात म्हणजेच वेश्या व्यवसायात गुंतल्याने पोलिसांना सापडल्याचे समजताच हतबल झालेला बाप या कथेत येतो. गोमंतकीय एक पिढी शेती व्यवसायावर पोसलेली होती. पण आज जागतिकीकरणामुळे देशी विदेशी पर्यटकांचा गोव्याकडे रेटा वाढला व शहरीकरणाच्या प्रक्रियेत शेती व्यवसायाकडे पाठ फिरवलेले गोमंतकीय बक्कळ पैसा कमावण्यासाठी वेश्याव्यवसायात अडकल्याचे वास्तव ही कथा मांडते.

### 5.4.2 खाण व्यवसायामुळे झालेल्या गोव्यातील बदलांचे चित्रण

निसर्ग व मानवामध्ये अनन्यसाधारण संबंध असल्याकारणाने माणसाने आपल्या गरजा भागविण्यासाठी सदैव निसर्गाशी संघर्ष केलेला आहे. या विषयी सुधीर रसाळ लिहितात, "मानव समूह निसर्गाशी एकतर संवादी नाते प्रस्थापित करतो किंवा जित-जेत्याचे नाते प्रस्थापित करतो. प्रत्येक संस्कृतीत निसर्गाशी ही दोन्ही प्रकारची नाती प्रस्थापित झालेली असली तरी या दोन नात्यांपैकी कोणते तरी एक प्रकारचे नाते तिच्यात प्रधान असते. मानव समूह ज्या भूमीवर वस्ती करतो तेथील निसर्ग मानवी जीवनाला किती अनुकूल आहे यावर मानवाचे निसर्गाशी कोणत्या प्रकारचे नाते आहे हे अवलंबून असते. जिथे निसर्गदत्त सामग्री मानवाच्या गरजा विनासायास, सहजपणे पूर्ण करते तिथे मानवाचे निसर्गाशी संवादी नाते असते. याउलट, जिथे निसर्ग मानवाच्या जगण्याला पुरेसा अनुकूल नसतो तिथे मानव प्रतिकूल निसर्गाला अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न करतो. त्याला नमवून त्याच्याकडून आपल्या गरजा तृप्त करून घेतो. अर्थात मानव आणि निसर्ग यांची नाती केवळ एवढ्यावरच अवलंबून असतात. ज्या मानव समूहात प्राथमिक गरजांशिवाय अन्य गरजांची मागणी तीव्र झालेली असते तिथेही निसर्गाला अशा गरजांच्या तृप्तीसाठी नमविण्याची प्रक्रिया सुरू होते." सुधीर रसाळ यांनी स्पष्ट केलेल्या मानव निसर्ग संबंधाचा विचार करताना लक्षात येते की निसर्गाधिष्टीत परंपरेशी संबंधित कृषिजीवन, काजू पोफळीच्या बागायती, मत्स्यसंस्कृतीतून निर्माण झालेली मासेमारी, गोपालन इत्यादींवर निर्भर असलेल्या गोमंतकीयांच्या प्राथमिक गरजांचे शमन झाल्यानंतर अधिकाधिक धन व संपत्तीच्या लालसेने खऱ्या अर्थी

गोमंतकीय माणसाचा व निसर्गाचा संघर्ष सुरू झाला, शेतीकडून खाण व्यवसाय, पर्यटन, कॅसिनो यांकडे आकृष्ट झालेली पिढी निर्माण झाली, ज्याचे चित्रण नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेमधून दिसून आले.

विठ्ठल गांवस आपल्या कथेत खाण व्यवसायामुळे ग्रामजीवनाची झालेली विध्वंसता, संपुष्टात आलेला शेतीव्यवसाय व हरवलेल्या ग्रामजीवनाचे चित्रण 'देऊळ' या कथेत करतात. एकेकाळी शेती व्यवसाय, गुराढोरांनी, नारळी पोफळींच्या बागांनी समृध्द असलेल्या गावात खाण व्यवसाय सुरू झाल्याने गाव लाल रंगाने माखला जातो. डोंगराला मोठमोठी भोके पाडली जातात. गावात आलेला शेट गावच्या देवळाची एक लाखाने बांधणी करण्याच्या बदल्यात गावातील डोंगरावरील माती नेण्याचा प्रस्ताव मांडतो. जपानमध्ये मालाची निर्यात करून शेट कोट्याने पैसे मिळवत असल्याचे समजताच लोक शेतीव्यवसाय सोडून खाणीवर कामास जातात. डोंगर व गावातील माती पोखरून पोखरून गाव उद्ध्वस्त होतो. शेवटी शेटजी विरुद्ध जंग छेडली जाते. कामगारांच्या चळवळी सुरू होतात. पिस्तुलांच्या फैऱ्या झाडल्या जातात. माणसांच्या रक्ताने तांबडी माती अधिकच लाल होते, गावात दारूची दुकाने सुरू होतात. एके काळी नंदनवन असलेल्या गावात जो तो एकमेकाला शिव्या देतो. शेवटी मातीतील सोने एक दिवशी संपते व चैनीची सवय झाल्याने पोट भरण्यासाठी लोक गाव सोडून जातात. देवळातील भटजीही पोटापाण्यासाठी गाव सोडून जातात. हातातून निसटलेल्या शेती व्यवसायाला पुनरुज्जीवीत करणे अशक्यप्राय होते. गावात एकटा फिरणारा 'तो' या सगळ्या बदलांना सामोरे जातो. ज्या मातीने आपला देह पोसला त्याच मातीत अंतिम श्वास आपणास घेता यावा या हेतूने 'तो' गाव सोडून जाणाऱ्या आपल्या मुला सुनेसोबत न जाता गावात राहतो. देवळाच्या आवारात फिरत, लालेलाल वातावरणात 'तो' गुदमरतो. देवाची लालेलाल झालेली मूर्ती घासून घासून त्याचे हात दुखू लागतात. मूर्तीला काळी चकचकीत करण्यासाठी 'तो' देवळाच्या तळयातील पाणी आणण्यास तळयात उतरतो व तोल जात तळयात कोसळतो. तांबड्यालाल पाण्यावर गोलाकार तरंग उमटतात व सगळीकडे शांतता पसरते असे एकूण चित्रण करत उद्ध्वस्त गावातील बदलांना सामोरे गेलेल्या गृहस्थाची शोकांतिका लेखक मांडण्याचा प्रयत्न करतात.

खाण व्यवसायामुळे उद्ध्वस्त होऊ पाहणाऱ्या ग्रामीण जीवनाचा संदर्भ 'गोष्ट आजोबांची' या कथेमध्ये आलेला दिसतो. वेळप्रसंगी आपण सावध झालो नाही तर आपल्या शेतजमिनी व शेकडो कुटुंबे उद्ध्वस्त होणार हा गोमंतकीय ग्रामीण जीवनासंदर्भातील प्रश्न लेखक विठ्ठल गांवस मांडतात. 'देऊळ' या कथेतील गावातील शेतीव्यवसायात गुंतलेल्या गावकऱ्यांना वेगवेगळी आमिषे दाखवत, खाण व्यवसायातून मिळणाऱ्या मालाची

जपानमध्ये निर्यात करून कोट्याने पैसे मिळवणारा शेट असे चित्रण करत उदारीकरणाची व जागतिकीकरणाची चिन्हे दर्शवतात.

दयाराम पाडलोस्कर यांची बदलत्या समाजजीवनाचा वेध घेणारी ‘म्हाळ’ ही कथा महत्त्वाची ठरते. मुंबईत स्थायिक झालेला व मुळांपासून तुटलेला रामा गावच्या ओढीने अस्वस्थ होतो व गहिवरतो. गेली दोन वर्षे रामा गावात फिरकलेला नसतो. गावातील शेती त्याने खंडाने दिलेली असते, पूर्वजांच्या मोठ्या माळीच्या घराला भलेमोठे कुलूप ठोकून, मुबई सारख्या महानगरात त्याने स्वत:चा दोन बेडरूमचा फ्लॅट घेतलेला असतो. गावी न जाता आपल्या फ्लॅटमध्ये मोठा गाजावाजा करून तो वडिलांचे श्राद्ध घालत असतो. पण श्राद्ध आटोपल्यानंतर पिंडास कावळा शिवत नसल्याने खंती होत असतो. मुंबईत बाराही महिने विकासकामे चालतात, मोठमोठे टॉवर उभारण्यासाठी अद्यावत यंत्रणे उभारली जातात. या यंत्रणांचा सततचा आवाज, क्रेनची सततची हालचाल यामुळे मुंबईतील पक्षांनी स्थलांतर केल्याने श्राद्ध पावन करून घेण्यास एकही कावळा फिरकत नसतो. आधुनिकीकरणामुळे परंपरागत जीवनावर मानवाकडून होणाऱ्या यांत्रिकी प्रहारामुळे, परंपरागत जीवनाला बसलेले हादरे व या कोंडीत सापडलेल्या माणसाचे चित्रण कथेत येते. अस्वस्थ रामा पत्नीने सुचविल्यानुसार यावेळी वडिलांचे श्राद्ध गावात करण्याचा निर्णय घेतो व आनंदित होतो. गोव्यात गेल्यानंतर गोव्यातील डोंगर माथ्यावर फिरणारी रंजू व राजू या रामाच्या मुलांना गोव्यातील गावात असलेल्या पोफळीच्या बागा गावानं विकून तर टाकल्या नाहीत ना? असा प्रश्न पडतो. गोव्यातील बदलांचे चित्रण या कथेत येते. गोव्यातील हिरवेगार डोंगर हिरवेगार न राहता खाण व्यवसायासाठी कंपन्यांच्या हवाली गेलेले असतात. मुळात रामाला आपल्या कुटुंबासोबत गोव्यात गेल्याचे व वडिलांचे श्राद्ध करत असल्याचे स्वप्न पडलेले असते. स्वप्नात त्याला गोव्यातील बदल जाणवू लागतो. धुळीचे साम्राज्य पावलोपावली दिसू लागते, शेती नेस्तानबूत झालेली दिसते, हिरवीगार कुळागरे रक्ताळलेली भासू लागतात. घरासमोरील तुळशी वृंदावनाऐवजी ट्रक दिसू लागतात. खाण व्यवसायामुळे लोकांच्या हातात बक्कळ पैसा आल्याने, पैशांच्या जोरावर गावकरी कित्येक वर्षांनी परतलेल्या रामाला दुर्लक्षित करतात. गावात येऊन रामा काही गावकऱ्यांच्या मदतीने म्हाळाची तयारी करतो. वडील दाजींसाठी घराबाहेर ‘वाडी’ ठेवतो. कावळयाच्या रुपात मृतात्मा पदार्थ खाऊन जातात असा समज असल्याने रामा कावळा येऊन पिंडास शिवून श्राद्ध पावन होण्याची वाट पाहतो. पण खाण व्यवसायामुळे हिरवाई नष्ट झाल्याने, रात्रंदिवस ट्रक, शेवाळयाच्या आवाजामुळे सगळे पक्षी परिसर सोडून स्थलांतरित झालेले असतात. या सर्व बदलांना तो स्वप्नात अनुभवतो. गोव्यातील बदलत्या स्थितीची जाणीव असलेल्या रामासाठी स्वप्नातही

गोव्यात झालेला बदल असह्य असतो. त्यामुळे गोव्यातील बदलत्या स्थितीची चाहूल लागल्याने श्राद्ध घालण्यास मुंबईहून गोव्यात जाऊ पाहणारा रामा गोव्यात न जाण्याचा निर्णय घेतो. आधुनिक गोव्यातील बदलांचे चित्रण 'म्हाळ' या कथेत येते.

### 5.4.3 पर्यटन व्यवसायामुळे निर्माण झालेल्या गोव्यातील प्रश्नांचे चित्रण

पर्यटन व्यवसायामुळे भाऊबंदकीत निर्माण झालेल्या प्रश्नांचे चित्रण मिलिंद म्हामल यांच्या कथेत येतो. त्यांच्या 'चतुर्थी' या कथासंग्रहात आलेल्या पहिल्याच 'चतुर्थी' या कथेत सदा आणि शिवा या दोन्ही भावांच्या नात्यामध्ये आलेल्या दरीचे व एकूण भाऊबंदकीचे चित्रण लेखक करतात. पर्यटन व्यवसायाला गती मिळाल्याकारणाने हॉटेल बांधण्यासाठी वडिलोपार्जित जमीन संपत्तीच्या हौसेने विकण्याचा निर्णय शिवराम घेतो. शिवरामचा निर्णय न पटल्याने दोघा भावांमध्ये भावनिक ताण निर्माण होतात. कृषीसंस्कृतीत वाढलेल्या दोन्ही भावांमधला प्रामाणिक पण अशिक्षित अशा सदाला त्याचा भाऊ शिवराम फसवतो. सदा शिपयार्डमध्ये नोकरी करून गावी परतलेला असतो. फसला गेल्याने वडिलोपार्जीत घरातून सदाला बाहेर पडावे लागते. मनात नसतानाही डोंगराची जागा विकण्यास संमती द्यावी लागते. आणि मिळालेल्या पैशातून सदाचा मुलागा नोकरी मिळवतो. नोकरी मिळाल्यानंतर मुलगा गाव सोडून जातो आणि वडिलांना, गावाला विसरतो. भावाशी जमत नसल्याने आपल्या घरात गणपती यावा व त्याची प्रतिष्ठापना आपल्या मुलाच्या व सुनेच्या हातून व्हावी म्हणून तो प्रयत्न करतो पण मुलगा गावात परतत नाही. भावाच्या ईर्ष्येने आपल्या घरात वेगळी चतुर्थी साजरा करणार होतो पण ती नीट साजरी न करता, अकरा दिवसांची चतुर्थी साजरी करण्याची इच्छा असतानाही, सदा दीड दिवसातच गणपतीचे विसर्जन करतो. ग्रामजीवनात पैशांना आलेल्या महत्त्वामुळे कौटुंबिक नात्यांमध्ये निर्माण झालेल्या दुराव्याचे आणि माणसाच्या मानसिक खच्चीकरणाचे चित्रण लेखक करतात.

म्हामलांच्या 'काळो आमो' या कथेची सुरूवात पणजीतील एका महाविद्यालयाने आयोजित केलेल्या परिसंवादातून होते. या परिसंवादामध्ये किनारपट्टीवरील वाढता पर्यटनाचा ताण कमी करण्यासाठी ग्रामीण भागातील प्रेक्षणीय स्थळांवर पर्यटकांना वळविण्यासंदर्भात विचारमंथन सुरू होते. गावातील एका झाडाचे पर्यटनस्थळात विकसित करण्याचे विचार चालेले असताना, दृकचित्रफितीच्या सादरीकरणाच्या माध्यमातून पुढे आलेले झाड निवेदकाचे लक्ष वेधून घेते. प्राध्यापक असलेल्या निवेदकाचे बालपण गावातील कृषीसंस्कृतीत गेलेले असते. शेतकऱ्यांचा कामानंतरचा विसाव्याचा आसरा असलेले 'काळो आमो' हे ते झाड असते. त्या

झाडावर 'देवचार' असल्याचीही समजूत असते. निवेदकाच्या बालपणातील आठवणींचा भाग असलेल्या झाडाचे रुपांतर कालांतराने 'The Black Mango tree' या नावाने होते. 'काळो आमो' या आंब्याच्या झाडाचे पर्यटनस्थळात रुपांतर करण्याचा प्रयत्न सुरू होतो. पर्यटनामुळे शेतीचे नुकसान होते. एकत्रकुटुंबपद्धतीला बसलेल्या झळीचे चित्रणही लेखक या कथेत करतात. भावाभावांमध्ये संपत्तीची वाटणी, वाटणी झाल्यानंतर कागदोपत्री नोंदणी करण्याचा निवेदकाच्या भावाकडून आलेला प्रस्ताव, जाग्याची वाटणी करूनही पडिंग राहिलेली शेती, इत्यादींचे चित्रण लेखक करतात. पर्यटनामुळे शेताच्या जागेवर पर्यटकांसाठी हॉटेल, पार्किंगची व्यवस्था करून पैसे कमावत शेतीवर पर्यायी व्यवसाय शोधला जातो. शेवटी पैशांच्या लालसेने शेत २० लाखात विकले जाते व मिळालेल्या पैशातून कॉंक्रिटची घरे बांधली जातात. गुरांचा गोठा विकून तिथेही घर बांधण्याचा विचार केला जातो. शेताच्या जागेवर इमारती, मेगा हाऊसिंग प्रकल्प, शॉपिंग मॉल, हॉल, हॉटेल्स, नर्सरी इ. बांधकामे उभारली जातात. गावात इमारती, नवीन पूल बांधले जातात. पण निवेदकाचे भावबंध जुळलेला 'काळो आमो' मात्र अस्तित्वात नसतो. मोठमोठे प्रकल्प उभारत पर्यटन व साधनसुविधांच्या उपलब्धतेसाठी, बांधकामासाठी निसर्गाचा ऱ्हास कशापद्धतीने अनुभवास येतो याचे ज्वलंत चित्रण मिलिंद म्हामल करतात.

म्हामलांची गोमंतकीय बदलती कुटुंबव्यवस्था व कौटुंबिक जीवनावर आधारित 'घर' ही कथा महत्त्वाची ठरते. वडिलोपार्जित घरात राहणारा हरी व हरीच्या भावांमध्ये आपुलकीचे नाते असते. कालांतराने दोन्ही भावांची लग्ने होतात, त्यांना नोकरी मिळते, एकत्रकुटुंबव्यवस्थेत भाऊबंदकीचे प्रश्न निर्माण होतात त्यामुळे शेतीभाती सोडून वडिलांच्या डोंगरावरच्या जागांवर दोन्ही भाऊ घरे थाटतात. मोठा भाऊ असलेला हरी आपल्या पत्नीच्या सांगण्यावरून गोठ्याची दुरुस्ती करून गोठ्यात आपला संसार थाटतो. शेतातली काही जमीन भाजी पिकविण्याच्या नावाने हरीची बायको राखून ठेवते. पत्नीच्या हट्टापायी हिप्पीशी (विदेशी नागरिकाशी) करार करून हरी शेतात बंगला बांधून घेतो. बंगला बांधायला त्याला विदेशीकडून पाच लाख रुपये दिले जातात. त्याबदलात तीन वर्षांच्या मोफत भाडेपट्टीवर बंगला रशियन कास्पारोवला देण्याचा करार केला जातो. हरीचा बंगला दारू, ड्रग्जचा अड्डा बनतो. रशियन तरुणींना वेश्याव्यवसायासाठी तिथे ठेवले जाते. तीन वर्षांचा करार संपत आलेला असता दोन रशियन तिथे आत्महत्या करतात व हरी व हरीच्या बायकोचे बंगल्यात राहण्याचे स्वप्न भंगते. वडिलांच्या मृत्यूनंतर आई एकटी असल्याने हरी बायकोसोबत पुन्हा जुन्या घरात येतो. रशियनने आत्महत्या केलेल्या घरातील आत्म्यांना शांत करण्यासाठी लाख दीड लाखांचा खर्च येणार असतो. दुसरीकडे शेतातल्या घरावर आणखी एक मजला बांधण्यास पाच लाख देत, पाच वर्षांच्या मोफत भाडेपट्टीचा करार

वाढविण्याचा प्रस्ताव रशियन पर्यटकाकडून मांडला जातो व त्यादृष्टीने हरीचे विचार सुरू होतात. विभक्त कुटुंबव्यवस्था, भाऊबंदकीचे प्रश्न, पर्यटन व्यवसायामुळे अनैतिक व्यवहारांना गोव्यात मिळणारी चालना या वास्तवाचा पट 'घर' या कथेतून लेखक मांडतात. जागतिकीकरणामुळे आलेल्या मुक्त अर्थव्यवस्थेमुळे पर्यटक फक्त पर्यटनासाठी गोव्यात न येता व्यवसाय थाटण्यासाठी गोव्यात येऊ लागले. याचे विपरीत परिणाम गोमंतकीय सामाजिक, सांस्कृतिक व कृषीजीवनावर उमटले. या पडसादांचे चित्रण मिलिंद म्हामल यांच्या कथेतून दिसून येते.

'आलकाण्याचो डोंगर' या कथेमध्ये, सांस्कृतिक महत्त्व असलेला गावकऱ्यांचा भक्कम असा तारणहार असलेला, नाचणी, उडीद, कुळीथ इत्यादी धान्य उगवण्यास सुपीक असलेला आलकाण्याचो डोंगर पर्यटन विकासासाठी फिगो नामक ब्रिटीश नागरीक विकत घेत गावकऱ्यांकडून डोंगर बळकावण्याच्या प्रयत्नात करतो. कधीही डोंगरावर न फिरकणारा भाटकार अचानक आलकाण्याच्या डोंगरावर येतो व डोंगर विकतो. पिकांच्या ऐवजी सिमेंट कॉन्क्रीटचे खांब तिथे तयार करण्यात येतात आणि आलकाण्याचो डोंगर काटेरी ताराच्या कुंपणाने वेढला जातो. गावकऱ्यांचे अनेक प्रश्न निर्माण होतात. गुरांना चरायला घेऊन कोठे जायचे? ही गंभीर समस्या निर्माण होते. आलकाण्याचो नवीन मालक असलेला फिगो आलकाण्याचा झरा अडवून त्याचे सुंदर तळयात रुपांतर करतो त्यामुळे गावकऱ्यांना मिरची लागवणीसाठी पाणी अपुरे पडू लागते आणि शेवटी पाणीपुरवठा कायमचा बंद होतो. आलकाण्यावर नववर्षाच्या निमित्ताने मोठमोठ्या रेव्ह पार्ट्या आयोजित केल्या जातात, अमली पदार्थांचे सेवन व विक्री होऊ लागते. 'आलकाण्याचो डोंगर' या कथेमध्ये अनैतिक व्यवहारांचे चित्रण करताना लेखक लिहितात, "वीस पंचवीस मोठ्या गाड्या आणि सुमारे दोनशे मोटरसायकली आलकाण्याच्या पायथ्याशी पार्क करून ठेवल्या होत्या. गेटमधून आत गेल्यानंतर सगळीकडे दारू आणि खाद्यपदार्थांची दुकाने थाटलेली दिसली. आलकाण्याच्या झरीजवळ नव्याने बांधलेला तलाव पाण्याने तुडूंब भरला होता. त्याच्या सभोवती खाटा, खुर्च्या व टेबलं मांडून ठेवली होती. ज्या ठिकाणावरून झरीचं पाणी खाली कोसळंत तेथे शिव-शंकराचं एक भलं मोठं चित्र समाधी अवस्थेत दिसत होतं. दहा बारा संगीतकारांचा एक गट पाश्चात्य संगीताद्वारे आलेल्या लोकांना रिझवत होता. संगीताला जोर चढत होता तसे सगळे बेफाम होऊन नाचत होते. अमली पदार्थांचे उघड सेवन चालले होते. काहीजण सिगारेटच्या सहाय्याने हुंगत होते तर काहीजण एका स्टॉलवर स्वत:ला अमली पदार्थांचे सिरिंज टोचून घेत होते. काहींना कपड्यांचेही भान नव्हते. मध्येच कोणाची आरडाओरड, किंचाळणे, ओरबाडणे आणि तडफडणे चालू होते." [11] आलकाण्याच्या डोंगरावर शनिवारचा

रात्रीचा बाजार सुरू झालेला. या बाजारात 'हिप्पी' म्हणजेच विदेशी पर्यटकांसाठी तयार कपडे, गळ्यात घालायच्या वस्तू, मालिश करण्याची व्यवस्था, बेटींगची व्यवस्था आणि अमलीपदार्थाचा मुक्त पुरवठा करणारे दलाल असे पर्यटनास लाभलेले बाजारू स्वरूप लेखक मिलिंद म्हामल या कथेतून मांडतात.

पर्यटनामुळे तरुणाईवर निर्माण झालेले गंभीर परिमाण दर्शवत शिवा या पात्राची पैसा व ड्रगच्या आहारी गेल्याने झालेली वाताहत मिलिंद म्हामल 'खेळ' या कथेतून मांडतात. आधी समुद्रकिनारी पर्यटकांची विशेष गर्दी नसायची त्यावेळी गावातील मुले तिथे टॅनिसबॉल क्रिकेट खेळायची. शिवाही उत्तम अशी क्रिकेट खेळत असे. समुद्रकिनाऱ्यावर शॅक चालवणाऱ्या डॉमनिकची क्रिकेट स्पर्धेच्या दरम्यान गावातील मुलांशी व शिवाशी ओळख होते. क्रिकेट स्पर्धा आयोजन करण्यासाठी तो गावातील मुलांना दहा हजार रुपये देतो. गावातील लोकांशी दोस्ती वाढवतो व शिवाला आपल्याकडे कामाला ठेवतो व आपले पार्सल व्यवस्थित डिकीमध्ये घालून आपल्यापर्यंत पोहोचविण्याचे काम त्याला देतो. आपल्याला या साध्या कामासाठी १ हजार रुपये दर दिनी इतका मोबदला का दिला जातो हे पडताळण्यासाठी शिवा पार्सल तपासतो तेव्हा त्यात अमलीपदार्थ असल्याचे त्याला समजते. घाबरलेला शिवा फक्त आठ दिवस काम करण्याचे कबूल करतो. पण दुर्दैवाने पकडला जातो. डॉमनिक पोलिसांनाही विकत घेत आपला धंदा चालू ठेवतो. समुद्रकिनाऱ्याचे चित्र पूर्णतः पालटते. बऱ्याच काळाने शिवा भेटतो तेव्हा त्याची प्रकृती बिघडलेली असते व ड्रग्स विक्रेता म्हणून सरकारच्या काळया यादीत त्याचे नाव येते. कौटुंबिक परिस्थितीही नीट नसल्याने शिवाला न सुटणारे ड्रग्सचे व्यसन लागते व त्यातच त्याचा अंत होतो. शिवामुळे अनेक गावातील तरुण ड्रग्सच्या धंद्यात जातात, समुद्रकिनाऱ्यावर आता पर्यटकांच्या खाटांमध्ये विकेट ठोकायला जागाही शिल्लक नसते. तरुणांच्या जीवनाचा एक वेगळाच खेळ चालू असल्याचे 'खेळ' या कथेच्या शीर्षकातून म्हामल सूचित करतात.

म्हामलांच्या 'अभिमान' या कथेत संस्कृती अभिमानी भिकाचा चरस, गांजा आणि गोमंतकातील मुला मुलींना ड्रग्सचे व्यसन लावणाऱ्या पाखल्याकडून म्हणजेच ड्रग्सचा व्यवसाय करण्यास पर्यटनाच्या नावाने येणाऱ्या परदेशी पर्यटकाशी झालेल्या झटपटीत खून होतो, पण तो नैसर्गिक म्हणून नोंदवला जातो व राष्ट्राचा अभिमान बाळगणाऱ्या भिकासाठी कोणीच पुढे सरसावत नाही अशी एकूण कथा आलेली आहे. गोव्यात पर्यटनामुळे निर्माण झालेली सद्यस्थिती व त्याला लाभलेले राजकीय वलय लेखक या कथेत मांडण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या 'हवा' या कथेमध्येही पर्यटनामुळे शॅक (समुद्रकिनारी पर्यटकांसाठी थाटलेली निवासस्थाने)

चालवायचा व्यवसाय स्वीकारल्यामुळे योगेशवर ओढवलेल्या स्थितीचे चित्रण लेखक करतात. भरपूर पैसा या व्यवसायात कमावता येतो पण समाधानासाठी गवंडी कामसुद्धा चालेले अशी शेवटी या कथेतील योगेश या पात्राची मनस्थिती निर्माण होते.

मिलिंद म्हामल यांच्या 'रान' या कथेमध्ये विकास व पर्यटनामुळे डोंगर विकले जातात व त्यात परंपरागत व्यवसाय करणाऱ्यांच्या जीवनाची वाताहत कशी होते हे लेखक मांडण्याचा प्रयत्न करतात. काजूच्या व्यवसायात तरबेज असलेला रामा डोंगरावरच्या 'काजी'मध्ये (काजूची झाडे) कष्ट करून उदरनिर्वाह करतो. मूळ डोंगर 'बामणांचा'(गोमंतकातील उच्चभ्रू सारस्वत ब्राह्मण समाज) असल्याने बामणाने करोडो रुपयांसाठी डोंगर विकल्यानंतर त्याचा धंदा बुडतो. २० वर्षे काजू व्यवसायाशिवाय अन्य काम केले नसल्याने पुढे काय? या प्रश्नाने त्रस्त झालेल्या रामाला दारूचे व्यसन लागते. रामाच्या कुटुंबाची वाताहत होते. त्यामुळे रामाची बायको गवंडीकामासाठी रानात जाते. बायकोच्या गवंडीकामास जाण्यास रामाचा विरोध असतो. एके काळी रानामुळे रामाचा संसार सुरू होता पण त्याच रानामुळे त्याच्या संसाराचे रान भाजले जाते असे सांगत लेखक समारोप करतात.

म्हामलांच्या 'देवचार' या कथेमध्ये पर्यटनामुळे गावातील लोकजीवनाचा भाग असलेल्या, सांस्कृतिक महत्त्व असलेल्या आणि पर्यटकांपासून अलिप्त राहिलेल्या समुद्रकिनाऱ्यांवरही पर्यटकांचे लोंढेच्या लोढे येऊ लागल्यामुळे ग्राम संस्कृतीवर पाश्चात्य संस्कृती कशी हवी झालेली आहे याचे चित्रण लेखक करतात. दहा वर्षांचा असलेला निवेदक आजोबा व मोठ्या भावासोबत 'हुडगे' म्हणजेच समुद्रात केवळ रात्रीचे बाहेर पडणारे खेकडे पकडायला जातो. अचानक हुडग्यांच्या एकदम भिरींच्या भिरी येऊ लागतात पण एकही हुडगा हाती येत नाही. दूर एक चूड पेटवलेली दिसते व ते काहीतरी चाळेगत असल्याचे वाटताच जास्ती आशा बरी नव्हे असे म्हणत ते परततात. काळोबा देवचारच चूड घेऊन आपली राखण करायला आला असल्याची ग्रामीण समाजजीवनातील समजुतीवर ही कथा बोलते. काळोबा देवचाराचे हॉटेल व्यावसायिकांच्या वतीने देऊळ बांधले जाते. काळोबाच्या वेशीतही बांबू हट्स उभारल्या जातात. हिप्पी पर्यटकांसाठी पार्टी व नाचगाण्यासाठी डान्स फ्लोर उभारले जातात. काळोबाच्या वडाची अडचण पर्यटनासाठी होऊ नये म्हणून वडाच्या पारंब्या छाटल्या जातात. काळोबाच्या परिसराचा कायापालट होतो. काळोबाला 'कायलोळी' (तांदुळाचे पीठ व गुळाच्या मिश्रणाने बनवलेली भाकरी) नैवेद्य म्हणून द्यायलाही गावातील लोक विसरतात. गावातील लोक दिवसेंदिवस व्यसनाधीन

होत जातात. काळोबानेही त्रासून आपले स्थान सोडले का? अशी शंका गावकऱ्याच्या मनात उपस्थित होते. या बदलत्या स्थितीमुळे निवेदकाचे आजोबा खंतावतात, त्यांची तब्येतही खालावलेली असते. चार वर्षांपूर्वी हुडगे पकडायला गेलेल्या आजोबांना तिथे परत जावेसे वाटते पण आता परिस्थिती बदलल्याने ते मिळण्याची शक्यता नसते. समुद्रकिनाऱ्यावरील सर्व जागा पर्यटकांच्या खाटांनी व्यापली जाते. हुडग्यांसाठी मोकळी जागा सोडली जात नाही. हुडगे धरून आण म्हणणाऱ्या आजोबांचे निधन होते. निधनानंतर मरणोत्तर संस्कार म्हणून आजोबांचे प्राण परत आणायचे असतात. या प्रथेनुसार मुठल्याला जीव किंवा पाखरू शिवला तरच आजोबांचे प्राण परत येईल व रीत निभावली जाईल अशी समजूत असते. पण किड्या मुंग्या मुठल्याला शिवत नाही. काळोबाला 'कायलोळी' घालणार असे नानांनी म्हणताच चार पाखरं मुठल्यावर बसतात व आजोबांची मरणोत्तर विधी पूर्ण होते. आजोबांची देवाला कायलोळी देण्याची इच्छा पूर्ण होते पण हुडगे आणून खायची त्यांची इच्छा अपुरी राहणार या विचारांनी निवेदक खंती होतो.

म्हामलांची 'लेनिनग्राड' ही कथा अत्यंत महत्त्वाची ठरते. पर्यटन आणि पैशांच्या मोहापायी ग्राम संस्कृतीला लागलेली काळिमा, या सर्वाला बळी पडलेला व वेश्याव्यवसायाला दिलेल्या प्रोत्साहनामुळे स्वत: एड्सचा बळी ठरलेल्या धनंजयच्या शोकांतिकेचे चित्रण लेखक करतात. म्हामलांच्या 'पांडुरंगाची प्रॉपर्टी' या कथेमध्ये पांडुरंग आपल्या आईकडून मिळालेली जमीन आईच्या निधनानंतर हंगामी तत्त्वावर भाड्यासाठी देतो. काजू, शेती करण्यासाठी कुळांना जमीन दिली जाते. पर्यटनाच्या नकाशावर नसलेले पांडुरंगाचे गाव व त्याची जागा बळकावण्यासाठी प्रयत्न होतात. आमिषे दिली जातात, राजकीय हस्तक्षेपही होतो, पत्नी मुलांचा रोष सहन करावा लागतो. पण पांडुरंग निष्ठावान असतो. आपल्या पश्चात आपली जमीन योग्य कामांसाठी, समाजासाठी वापरली जावी अशी मृत्यूपत्रेही तो तयार करतो पण त्याच्या मृत्युपश्चात मृत्युपत्र वाचण्याआधीच जमिनीचे हस्तांतरण झालेले असते. हॉटेल मालकाने भाट हस्तगत केलेले असते. पांडुरंगाच्या शेवटच्या इच्छेनुसार त्याचे अंत्यसंस्कारही तिथे करण्यास मनाई होते. शेवटी राजकीय खेळीपुढे तो अपयशी ठरतो. गावच्या शेतजमिनीचे रुपांतर पर्यटकांच्या मौजमजेसाठी आणि गरजा पुरवण्यास होते. गोमंत समाजजीवनातील बदलांचे चित्रण 'पांडुरंगाची प्रॉपर्टी' या कथेमध्ये दिसून येते तसेच 'आडवन' या कथेमध्ये भाटकाराचा मुलगा मुंबईत स्थायिक झाल्याने व त्याच्या कुटुंबाचा निर्वंश झाल्याने कुळ – मुंडकार व्यवस्थेला धनंजय धाब्यावर बसवतो. भाटकाराने वसविलेल्या जागेची 'पावर ऑफ अटोर्नी' मिळवून पांडे या परप्रांतियास पाच कोटीत विकतो. आडवनचे पांडववन होते, पर्यटकांसाठी सगळ्या सुविधा तिथे उपलब्ध केल्या जातात. पण गावकऱ्यांचे आडवान

बळकावले जाते. शेवटी बक्कळ पैसा मिळवूनही धनंजय बदललेल्या परिस्थितीमुळे खंती होतो. या कथेत लेखक गोमंतकातील कुळ-मुंडकार व्यवस्थेवरही भाष्य करताना दिसून येतात.

दयाराम पाडलोस्कर यांच्या 'वाऽऽऽ कितें?' या कथेत समुदकिनारी साचलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्याकडे पाहून रोज हसणारी वेडी दिसून येते. तिला रोज कचरा खुणावतो. ती कचरा गोळा करते. पिशवी खाकोटीला मारून चालू लागते. समुद्रकिनाऱ्यावर बसलेले पर्यटक तिच्याकडे आकर्षित होतात. तिच्या हातात काय असल्याचे विचारतात. काही क्षणासाठी ती गप्पच राहते व नंतर मोठ्याने ओरडते, "धीस इज बिग प्रॉब्लेम." ती वेडी असते पण सुशिक्षित असते. सुसाट वाऱ्यासारखी समुद्रकिनाऱ्यावर फिरत असते. वेडी कचऱ्याला उद्देशून त्याला जाळून टाकणार असल्याचे सांगते तर कचरा आपल्या उत्पत्तीची ताकद तिला सांगतो. निर्विकार चेहऱ्याने वेडी ते ऐकते. आपल्याशी संवाद साधणाऱ्या कचऱ्याला झिडकारते, त्याचा राग तिला येत नाही तर बुद्धीचे शेपूट हलवून जगणाऱ्या मानवरूपी जनावरांचा तिला राग येतो असे लेखक लिहितात. माणसांना बुद्धी असली तरी माणसे कचरा पसरवत बुद्धीहीनतेचे दर्शन घडवतात हे यातून उद्धृत होते. तिची वाट पाहत थांबणाऱ्या 'त्याचे' म्हणजेच कचऱ्याचे चित्रण लेखक करतात. किनाऱ्यावर फिरत असताना रिकामी शहाळी किनाऱ्यावर फेकणाऱ्यांचा तिला राग येतो. त्यातल्या स्ट्रॉकडे ती निरखून पाहू लागते. स्थानिक लोक आलेल्या पर्यटकांच्या आदरतिथ्यास तल्लीन असतात, आणि दुसरीकडे 'तो' म्हणजेच कचरा खूप फोफावतो. त्याच्या हकालपट्टीसाठी सरकारी कार्यालयात अर्ज करावेसे कोणासही वाटत नाही. नवीन वर्षाच्या स्वागताच्या पार्टीत आपल्याला उष्टे असेना पण चविष्ट जेवण मिळणार या आशेने ती ओठांवरून जीभ फिरवते. पर्यटनामुळे गोव्यात होणाऱ्या पार्ट्या व सांस्कृतिक मूल्यांच्या ऱ्हासाचे चित्रण लेखक करतात. उदा. "पोलीसांच्या हातावर तिनं डोळा काढला. कुंपण ओलांडून आत गेली. संगीताचा जोर छाती हलवत होता. देहभान विसरून देशी- विदेशी पर्यटक नाचत होते. कोण कुणाची छाती दाबत होता, तर कोण कुणाचा ओठ चावत होता. नशेचा नग्न अवतार पावलापावलावर धिंगाणा घालत होता. डोळे दीपवून टाकणारी रोषणाई तिला खिजवू लागली. तू इथून जा म्हणू लागली. तरीही ती अंग चोरून आजूबाजूनं चालत पुढे गेली. तिला तो दिसायचा. इशारा करायचा, आपल्याजवळ बोलवायचा. ती त्याच्याजवळ जायची. तेवढ्यात नाचणारा त्याला चिरडून जायचा. त्याच्यातलं उष्ट अन्न जमीनदोस्त व्हायचं. ती पोटाला चिमटा काढून गप्प उभी राहायची. आता तिला राग आला. वेडीच ती राग येणारच. थेट गोऱ्या विदेशी पाहुण्याकडे जाऊन उभी राहिली. त्याने विलंब न लावता नाचायला हात पुढे केला. ती त्याच्याबरोबर नाचू लागली. भुकेमुळे नाचून लवकर थकली. 'हॅप्पी न्यू इयर' म्हणून त्या गोऱ्या पाहुण्यानं तिला सोडून दिली."[12]

पर्यटकांच्या सिगारेटी शिलगावणारा लायटर घेत ती साचलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्याला आग लावते. लोक सूर्यबर्न पार्टीत नाचतात तर ती देहभान विसरून ढिगाऱ्याभोवती नाचते. गोव्यात पर्यटनामुळे झालेल्या मूल्यऱ्हास व पर्यावरणावर केलेल्या आघाताचे चित्रण कथेत येते. Green Goa, Clean Goa च्या पाट्या फक्त फोटोंसाठी वापरून घेणारे पर्यटक इ. चित्रण कथेत येते. आपल्या सामाजिक, सास्कृतिक, पर्यावरणीय ऱ्हासास जबाबदार पर्यटक जितके आहेत तितकेच जबाबदार आपणही आहोत का? असा प्रश्न लेखक उपस्थित करतात. गोव्यातील रुजणाऱ्या पर्यटनकेंद्री संस्कृतीमुळे उद्ध्वस्त झालेल्या गोव्याचे चित्र 'वाऽऽऽ किर्ते?' या कथेत लेखक चितारतात.

### 5.4.4 कॅसिनो संस्कृतीचे गोव्यातील समाजजीवनावर उमटलेले पडसाद

मिलिंद म्हामल 'पणजीची कहाणी' या कथेमध्ये गोव्यातील राजधानी पणजीमध्ये विकासामुळे झालेली स्थित्यंतरे सांगताना पणजीतील कॅसिनोसंस्कृतीचे चित्रण करतात . दयाराम पाडलोस्कर यांच्या 'घुसमट' या कथेत शहरातून जाणारी गोव्यातील मांडवी नदी विकासाच्या नावाने गुदमरून जगते. उत्पादनामुळे अत्याचार सोसते व सरकार तिच्यावर बळजबरी करतो हा प्रश्न कथेतून येतो. बदलांमुळे अस्वस्थ झालेल्या माणसाचे चित्रण या कथेत येते. तंत्रज्ञानाचा अवकाश वाढत असल्याने उत्पादन क्षेत्रात असलेल्या 'त्याला' मनाविरुद्ध जाहिरातबाजी करण्यास मालक भाग पाडतो. अस्वस्थ झालेला 'तो' अर्ध्या दिवसाची सुट्टी घेऊन घरी परततो. व आजच्या बदलांना अनुभवू लागतो. दुचाक्यांची वाढती वर्दळ, शरीरप्रदर्शन करणाऱ्या पर्यटक बाया, नदीत रुतलेले कॅसिनो, बियरच्या मोठमोठ्या जाहिराती या सर्व बदलांना अनुभवतो, निसर्गाच्या नाममात्र ओढीने गोव्यात आलेल्या दारू पिणाऱ्या पर्यटकांना अनुभवतो. आधुनिकता कितपत स्वीकारावी हा प्रश्न त्याला पडतो. आपण अवलंबू पाहणाऱ्या पाश्चत्य जीवनपद्धतीचा विचार करतो. कॅसिनोत काम करणारे नेपाळी मुला मुलींचे घोळके त्याला खुणावतात. कॅसिनोत काम करणारे हे गोवेकर नसून परप्रांतीय असल्याची जाणीव त्याला होते. ढासळत्या सांस्कृतिक व सामाजिक मूल्यव्यवस्थेत आपल्या परंपरेसाठी लढा देणे गरजेचे असल्याचे त्याला वाटू लागते. ध्वनीप्रदूषण करत, देहभान विसरून मजामस्ती करणाऱ्या पर्यटकांना आपल्यात सामावून घेत जाणारी क्रूझबोट त्याला दिसते. परप्रांतीयांची एकच झुंबड त्याला तिथे दिसते. या लोकांनी गोवा संपविल्याची चिन्हे दिसू लागतात. आजची लहानगी पिढी या बदलांना स्वीकारत असल्याचे त्याला दिसू लागते. लेखक लिहितात, "क्रुझ बोटीमधला तो लहान मुलगा बदल स्वीकारत आहे. आपण त्याला बदल स्वीकारायला लावत आहोत. काय

वाईट? पांडव पण जुगार खेळले, पत्नीला डावाला लावून. आज आपण कॅसिनोत खेळतोय, अर्धनग्न पत्नीच्या हातात दारूचा ग्लास देऊन"[13] आजच्या चंगळवादी संस्कृतीमुळे सर्वसामान्यांनाही खाजगी वाहनांचे वेध लागल्याचे चित्रण लेखक करतात. आधुनिक काळात राहणीमानात झालेल्या विलक्षण अशा बदलांचे चित्रण करताना लेखक लिहितात, "पोर्तुगीजांचा अत्याचार सोसून पूर्वजांनी संस्कृती टिकवून ठेवली. आम्ही ती जतन करून ठेवली पाहिजे. आपण जतन करून काय ठेवतो आहोत? हा मात्र संशोधनाचा प्रश्न. केवढी मजा यायची देवकार्यात केळीच्या पानावर जेवायला. आईनं हाताच्या बोटानं ओसरीवर सारवलेलं शेण आजच्या चकचकीत फरशांना मागं टाकतं. कितीतरी आहेत अजून ओल्या आठवणी. आधुनिकतेचा स्वीकार करून जगताना एकेक आठवून जगलं पाहिजे. "[14] गावात वाढलेल्या आपल्या पत्नीला आधुनिकतेचे फायदे सांगावे असे त्याला वाटते. कामावरून घरापर्यंत बसने उतरल्यानंतर एरवी सावकाश उतरणारा तो सर्वप्रथम उतरतो व धकाधुकीच्या स्पर्धात्मक आधुनिक जगातील बदल स्वीकारतो. पत्नीला आधुनिकतेचे फायदे सांगू पाहणारा तो आपली बायको साडीचा पेहराव सोडून चुडीदार परिधान करू लागल्याचे जाणवताच गंभीर बनतो. आधुनिक जगण्यात पारंपारिक मानसिकता व राहणीमानात वाढलेल्या 'त्याची', बदल स्वीकारताना होणाऱ्या घुसमटीचे चित्रण 'घुसमट' या कथेत येते.

### 5.4.5 जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या चंगळवादी संस्कृतीचे चित्रण

आजच्या गोमंतकीय समाजजीवनात आलेल्या बदलांवर भाष्य करणारी गजानन देसाई यांची 'हिशेब' ही महत्त्वाची कथा आहे. आपल्या मुलाच्या लग्नाला पाच – सहा दिवस उलटले तरी 'ओवाळकी' पार न पाडल्यामुळे महेश व त्याची बायको मनीषा 'ओवाळकी' करणाऱ्या माणसाच्या शोधार्थ असतात. आजकाळ पारंपारिक कामे निभावणारा कोणी भेटत नाही याची त्यांना खंत असते. सिनेमाने आज आपल्या वैवाहिक रितीभातीमध्ये बदल घडवून आणल्याचे महेशला वाटते. बूट लपवण्याच्या नावाखाली हजारोनी पैशांची मांग केली जाते. या बदलांच्या विचारात महेश असताना 'ओवाळकी' करणारा चालून त्यांच्या घरी येतो व 'ओवाळणी' संदर्भात विचारणी करतो. आपण खाण व्यवसायात असून, मालाची ने आण करताना वाड वडिलांचे 'ओवाळणी'चे परंपरागत काम मात्र आपण पुढे नेल्याचे सांगतो. 'ओवाळणी' करून बक्कळ पैशांची मागणी करतो. आणि जास्ती पैसे मागितल्याची कारणे देत म्हणतो, "व्हैनी, तुका ना कळचें तें. पात्रांव, आता हो धंदो कोणूय करीनात. घाराणें घातलें काय खूप त्रास जाता जीवाक. पदराक थोडो सोरो आसल्याशिवाय धाडस

येयना. पैलीचे जाणटे आसले, त्यांका काजूचो सोरो चलतालो. पुण मी ‘रॉयल स्टेगा’शिवाय कांयच घेयन. शंबर रुपया त्याकाच गेले. हो कोमडो काय भेष्टोच म्हारून व्हडयतलो ?’ मसाल्याक शंबर रुपया जाये ? व्होंवाळकी केली म्हुणोन कळलें काय शेजारी जेंवणांक येतले. त्यांका सोरो आणि पाव शंभर रुपया हिंडेंच सौंपले ? म्हाका फक्त शंभर रुपयाचा उरतले !...” [15] रूढी परंपरांच्या नावावर होणारा व्यवहार या कथेत लेखक दर्शवितात. चंगळवादी संस्कृतीचे चित्रण ‘हिशेब’ या कथेत येते. आज भोगवादी प्रवृत्ती बळावलेली आहे. ऊंची दारू सर्वांना हवी आहे. लग्नांचा हिशेब लाखांच्या घरात जातो. सुखाचे प्रदर्शन आज मोठ्या प्रमाणात होत आहे. लहानग्या मुलांना भाकरी नकोय तर जागतिक खाद्यसंस्कृतीने फोफावलेला ‘पिझ्झा’ हवाय. फ्लॅटसंस्कृतीमुळे परंपरागत व्यवसाय स्वीकारणारी माणसे मिळत नाहीत व जे मिळतात ते पैशांच्या लालसेने सर्वसामान्यांना फसवतात याचे चित्र ‘हिशेब’ या कथेत येते. गजानन देसाईंची कथा प्रामुख्याने ग्रामीण समाजजीवनात वावरत असताना, ‘हिशेब’ सारखी एखादी अपवादात्मक कथा जागतिकीकरणामुळे फोफावलेल्या चंगळवादी संस्कृतीचे चित्रण घडवताना दिसून येते. विठ्ठल गांवस यांच्या ‘लिब्रूची इच्छा’, ‘दर्याचा पूत’ या मधील जागतिकीकरणामुळे फोफावलेल्या आधुनिक जगण्याला, फ्लॅट संस्कृतीला कंटाळलेली जुनी पिढी व सुखासीन जीवनाकडे ओढल्या गेलेल्या नवीन पिढीच्या माध्यमातून, नवीन पिढीचा चंगळवादाकडे वाढलेला कल इ. चित्रण गांवसांच्या कथेत येत.

### 5.4.6 सांस्कृतिक एकजिनसीकरणामुळे, पाश्चात्य संस्कृतीकडे ओढल्या जाणाऱ्या नवीन पिढी व जुन्या पिढीमधील संघर्षाचे चित्रण

‘संस्कृती आणि वाङ्मयनिर्मिती’ या लेखात सुधीर रसाळ लिहितात, “आपल्या प्राथमिक गरजा आणि त्यांच्याशी निगडित असलेली सुखे भागवण्यासाठी तसेच अनेक सुखांचे वर्धित भोग घेण्यासाठी मानव समूह अन्य भूमीत तयार होणारी उत्पादने मिळवतो. अशा उत्पादनांना आपल्या जीवनपद्धतीत स्थान देतो. हे जरी घडत असले तरी प्रत्येक मानव समूहाच्या जीवनपद्धतीचा पाया भूमीजन्य उत्पादनेच राहतात. भूमीचे गुणधर्म आणि वातावरण यात जर लक्षणीय बदल झाले तर त्यांच्याशी जुळवून घेण्यासाठी मानवाला आपल्या जीवनपद्धतीत इष्ट ते बदल करावे लागतात. त्यामुळे त्याच्या संस्कृतीतही मूलगामी परिवर्तन होते.”[16] गोमंतकातील वाढत्या शहरीकरणाने इथल्या राहणीमानावर इथल्या जीवनपद्धतींवर झपाट्याने बदल झाला. जागतिकीकरणामुळे होणारे सांस्कृतिक एकजिनसीकरण व या प्रक्रियेचा भाग असलेल्या गोमंतकातील नवीन पिढीमध्ये निर्माण झालेली पाश्चत्य संस्कृती, राहणीमानाच्या वाढत्या आकर्षणामुळे सांस्कृतिक जीवनात स्थित्यंतरे निर्माण झाली व जुन्या

व नव्या पिढीतील संघर्ष वाढला. गोमंतकीय कथेतून या संघर्षाचे चित्रण होऊ लागले. विठ्ठल गांवस यांच्या ‘दर्याचो पूत’ या कथेमध्ये पारंपारिक लोकजीवनावर हावी झालेल्या आधुनिक जीवनपद्धतीचे चित्रण लेखक करतात. पारंपारिक जीवन जगलेल्या नानुवर लादलेले फ्लॅट संस्कृतीचे ओझे, त्याच्या मनाविरुद्ध कास्टी सोडून चड्डी परिधान करणारा नानू, उतारवयात समुद्रावर मासे पकडणारा खारवी म्हणून सुनेकडून होणारी त्याची हेळसांड, वाडवडिलांचे घर विकून फ्लॅट घेत नानूला मासे पकडण्याचा खारव्याचा परंपरागत व्यवसाय सोडण्यास भाग पाडणारे नानूचा मुलगा व सून असे एकूण चित्रण कथेत येते. या विरोधाला न जुमानता शेवटी आपल्या परंपरागत व्यवसायाशी निष्ठा ठेवत समुद्रात स्वत:स झोकून देणाऱ्या नानुचे चित्रण ‘दर्याचो पूत’ या कथेमध्ये आलेले आहे. पारंपारिक मीठाच्या शेती व्यवसायाला संपुष्टात आणण्याचा प्रयत्न तसेच धनिकांच्या कारखान्यात मिठाचे उत्पादन तयार करण्यासाठी चाललेले प्रयत्न ‘लवण’ या कथेत चित्रित करत पारंपारिक मानसिकता व नव्या पिढीच्या मानसिकतेतील संघर्ष व आधुनिक जीवनात निर्माण झालेले प्रश्न मांडण्याचा प्रयत्न लेखक करतात.

पर्यटनामुळे होणाऱ्या मूल्यऱ्हासाला कारणीभूत ठरलेली नवी पिढी व जुन्या विचारांशी, आपल्या मूल्यांशी बांधील असलेली पण प्रतिकार करू न शकणारी जुनी पिढी या मधील संघर्ष “सायबिणी ऽऽऽ पाव गे ऽऽऽ” या कथेत लेखक ज्ञानेश्वर कोलवेकर चित्रित करतात. या कथेतील शेरोलीनचा मुलगा जुआंव व सून दुबईला गेल्याने नातवंडाची जबाबदारी म्हाताऱ्या शेरोलीनवर येते. वयात आलेल्या लिझ या आपल्या नातीला सांभाळणे तिला जड जाते. लिझ घरात न सांगता ब्रिटनहून आलेल्या फेड्रिक या तिच्या मित्रासोबत मोटरसायकलने फिरू लागते. तर नातू एडमंड हिप्पींच्या म्हणजेच पर्यटकांच्या मागोमाग असतो. आपल्या नातवंडांच्या जीवनात चाललेल्या गोष्टी तिला असह्य वाटतात. प्रतिकार करण्याची क्षमता नसल्याने गलितगात्र जिणं जगण्याशिवाय तिच्यासमोर पर्याय नसतो. सूर्यास्त होतो तरी लिझ न परतल्याने ती अस्वस्थ होते. व शेवटी “सायबिणी ऽऽऽ पाव गे ऽऽऽ” म्हणत देवाला हाका घालते. कोलवेकर आपल्या ‘पिकनिक’ या कथेत गोव्यात झालेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर दोन पिढींमधील वाढते अंतर स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. कधी काळी काटकसरीचे जीवन जगणारी जुनी पिढी व दुसरीकडे सुखवस्तू जीवन जगणारी नवीन पिढी यांचे चित्रण कथेत येते. गोव्यात होणाऱ्या बदलांमुळे लहानग्यांच्या मनावर योग्य संस्कार होण्याऐवजी बालमनावर प्रकर्षाने उमटणाऱ्या नकारात्मक पडसादावर ही कथा बोलते. आपले बालपण हलाखीत गेल्याने भूतकाळ विसरू पाहणारा, आपल्या वडिलांना आपल्या त्या परिस्थितीला जबाबदार ठरवत आपल्या मुलांवर ती परिस्थिती ओढवू नये म्हणून मुलांसाठी सर्व

प्रयत्न करणारा, मुलांच्या आनंदात स्वत:चे सुख पाहणारा पिता या कथेत येतो. मुलांच्या पिकनिकची अत्यंत उत्साहाने तयारी करणारा, दिवसभर मुलांच्या पिकनिकची चिंता लागून असलेला पिता या कथेत येतो. पिकनिकहून परतलेला मुलगा आग्वाद किल्ल्यासारखी ऐतिहासिक स्थळे न पाहाता समुद्रकिनारे, तिथे विवस्त्र फिरणारे परदेशी पर्यटक, फॉरिन मालाचा भरलेला बाजार याकडे आकर्षित झाल्याने त्याला बदलत्या जगाकडे, मूल्यांकडे आकर्षित झालेल्या आपल्या मुलांची चिंता सतावते.

### 5.4.7 परदेशात कामानिमित्त गेलेल्या व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा भाग बनलेल्या गोवेकरांच्या व्यथा

जागतिकीकरणामुळे नोकरीच्या अमाप संधी गोमंतकीयांसाठी खुल्या झाल्याने. गोमंतकीय जनता खासकरून ख्रिस्ती जनता नोकरीस विदेशात जाऊ लागली व बक्कळ पैसा कमवू लागली. भरपूर पैसा संपत्तीमुळे पारंपारिक जीवनास नाकारू लागली. गोमंतकीयांच्या मातीच्या घराचे कॉन्क्रीटचे बंगले झाले. बदलत्या राहणीमानासह समाजजीवनात, नातेसंबंधात गुंते निर्माण झाले. याचे चित्रण 'लिब्रूची इच्छा' या विठ्ठल गांवस यांच्या कथेमध्ये आलेले आहे. ज्ञानेश्वर कोलवेकर यांच्या 'वारूळ' या कथेत बोटीवर काम करणारा 'बोट्लेर'(खलाशी) नवरा मिळाल्याने आनंदित झालेली ॲनी दीड वर्षे झाली तरी मिल्टन न परतल्याने दुखावते. किमती वस्तू, साड्या, सेंट, पावडर अशा फॉरेन वस्तू घेऊन येणारा नवरा घरी परततो. तीन चार महिने झपाझप त्याच्या संगतीत निघून जातात व मिल्टन निघून गेल्यानंतर परत तिच्या आयुष्यातील ओक्याबोक्या रात्री सुरू होतात. बोटीवर काम मिळाल्याने परदेशी फिरस्तीवर असलेल्या खलाशी नवऱ्यामुळे निर्माण झालेली ख्रिस्ती स्त्रीची व्यथा ही कथा मांडते. या कथेत स्त्री मनाचा वेध घेताना लेखक दिसतात. मुंग्याचा थवा रात्री तिच्या शरीरावर चाल करून येते. शरीराला रात्र गात्रंन गात्र टोचू लागते व त्या टोचणींचे शमन करण्यासाठी ती व्हिस्कीचा आधार घेते. तिच्या शरीराची व तारुण्याची गरज लक्षात घेत तिची मैत्रीण ऑफेलीन तिला फुलणारे तारुण्य वाया न घालवता 'फिगरेद' म्हणजेच परपुरुषाशी नाते ठेवण्याचा सल्ला देते. वासनाग्रस्त अशा ॲनीच्या मानसिकतेचे चित्रण या कथेत येते. व्हिस्कीच्या नशेत मिल्टनकडून शारीरिकसुखाचा भास अनुभवणारी व आपल्या शरीराला टोचणाऱ्या मुंग्यांना शमविणारी ॲनी 'वारूळ' या कथेत येते. तारवटी म्हणून आयुष्यभर पैशांसाठी काम करत, शरीरसुखासाठी वेगवेगळ्या स्त्रियांशी संबंध ठेवणारे त्यांचे कर्ते पुरुष आयुष्याच्या उतारवयात कायमचे घरी परततात व त्यावेळी त्याच्यात तरुणपणाचा जोम नसतो. दिवसभर दारू पिऊन, फुटबॉल पाहत, मासे पकडीत ते

शेवटी घरी परततात. असे एकूण ख्रिस्ती पुरुषांच्या जीवनाचे वास्तव चित्र ज्ञानेश्वर कोलवेकरांची 'वारूळ' ही कथा मांडते. बदलत्या गोव्याच्या पार्श्वभूमीवर ही कथा येते. मिलिंद म्हामल यांच्या 'गोलकारनीचा कुवेटकार' या कथेत परदेशात कूवेटमध्ये कामानिमित्त गेलेल्या मुलामुळे गोलकारनीच्या घरात संपत्ती नांदू लागल्याकारणाने शेती भाटांकडे दुर्लक्ष केले जाते. शेतं पडिंग पडतात. घरातील शेणाच्या जमिनीची जागा टाईल्स घेतात. घरकामासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व्हायला लागतो. व्यसनाधीनता वाढते. गोलकारनीचा धाकटा मुलगा गोव्यात येणाऱ्या पर्यटकांना भाडोत्री तत्रावर गाड्या देऊन कमावतो. शेतांकडे पुर्णपणे दुर्लक्ष केलेल्या गोलकारनीच्या मुलाची नोकरी बुडाल्याने ती पुन्हा शेतीकडे वळते. कृषी संस्कृतीचे महत्त्व सांगत बदलत्या गोमंतकीय जीवनातील बदलांचे चित्रण या कथेतून मांडण्याचा प्रयत्न लेखक करतात.

### 5.4.8 उदारीकरण व खाजगीकरणामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांचे चित्रण

ग्रामीण समाजजीवनात झपाट्याने झालेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर विठ्ठल गांवस यांची 'गाभ' ही कथा आलेली आहे. मोठमोठे कारखाने बांधण्यासाठी शेटजी या मोठ्या प्रस्थाकडून मागणी असल्याने आपली शेतजमीन शेड्ड्यू नाईलाजाने विकतो. जमीन विकल्यानंतर कारखाना गावात आल्याने ग्रामीण लोकजीवनात प्रश्न उपस्थित होतात. दूषित हवा पाण्यामुळे, शेड्ड्यूने विकत घेतलेली म्हैस गाभ सांडू लागते. शेतजमिनी विकून मिळालेल्या पैशातून व कर्ज काढून शेड्ड्यूचा मुलगा ट्रक घेतो. पण हाती आलेल्या बक्कळ पैशांमुळे दारूच्या आहारी जात स्वत:चा व्यवसाय बुडवतो. शेड्ड्यूला मारहाण करतो. आधुनिक जगण्यातील स्थित्यंतरांमुळे, गावागावात कारखाने आल्याकारणाने ग्रामीण जीवनातील वाताहतीचे चित्रण लेखक करतात. 'लवण' या कथासंग्रहातील 'लवण' ही पहिलीच कथा. या कथेत दादू या मीठ उत्पादक शेतकऱ्याच्या दारूण अवस्थेचे चित्रण करण्यात आलेले आहे. मीठागरात पिकवलेले मीठ खाल्ल्यास गळा मोठा होऊन रोग होतो, त्यामुळे पारंपारिक पद्धतीने तयार होणाऱ्या मीठ उत्पादनावर लादलेली बंदी व त्याविरुद्धचा दादूचा लढा याचे चित्रण लेखक करतात. या कथेत सरकारविरुद्ध संघर्ष आहेच त्याचबरोबर दोन पिढ्यांचा संघर्षही आहे. दादू पारंपारिक शेती टिकविण्याच्या प्रयत्नात आहे तर त्याचा मुलगा मीठ उत्पादनाला घाण म्हणणाऱ्यांपैकी आहे. सरकारच्या विरुद्ध जाणाऱ्या दादूला जेव्हा पोलीस पकडून नेतात तेव्हा दादूचा मुलगा त्याला सोडवतो, पण वडिलांना फसवून त्यांची सही मिळवतो व मिठाची शेती बंद पाडणार या अटीवर सरकारकडून पैसेही घेतो. आपली फसणूक झाली तरीही आपल्या मुलापुढे न झुकणारा दादू पुन्हा शेतात जातो पण शेवटी दादुच्या शेताचा बांद फोडल्याने समुद्राचे

पाणी शिरते व केलेली शेती नष्ट होते. विठ्ठल गांवसांच्या कथेतही खा-उ-जा संस्कृतीचे पडसाद उमटताना दिसून येतात. 'लवण' या कथेमध्ये मीठ उत्पादनाची जमीन बळकावून तिथे पारंपारिक मिठाची शेती नष्ट करण्याच्या प्रयत्नात असलेले सरकार. धनिकांच्या फॅक्टरीत बनणारे महागडे मीठ खपवण्यासाठी, पारंपारिक मिठाच्या शेत जमिनी विकत घेत, खाजगीकरणाला बळकटी देण्याचा यंत्रणेचा प्रयत्न 'लवण' या कथेत दिसून येतो.

## 5.5 समारोप

जागतिकीकरणामुळे जग हे एक गाव बनेल ही संभावना व्यक्त केली जाते. पण भारताच्या एकूण भौगोलिक स्थितीमुळे भारताची सांस्कृतिक पृथगात्मकता टिकून राहिल्याचे दिसून येते. गोव्याची पृथक अशी सांस्कृतिक वैशिष्ट्ये अबाधित राहिल्याचे सत्यही जागतिकीकरणानंतरच्या तीन दशकात नाकारता येत नाही. गोमंतकीय मराठी कथेत गोमंतकीय प्रदेशात जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या ऱ्हासाचे चित्रण दिसत असले तरी कथेतील वातावरण व एकूण परिवेष हा गोवा प्रदेशाच्या भौगोलिक व सांस्कृतिक वैशिष्ट्यानुसार आकार घेताना दिसून येतो. अभ्यासासाठी निवडलेल्या लेखकांपैकी ज्ञानेश्वर कोलवेकर, विठ्ठल गांवस, मिलिंद म्हामल, दयाराम पाडलोस्कर व गजानन देसाई यांनी नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतील उमटविलेले खा-उ-जा संस्कृतीचे पडसाद हे मागील दोन दशकात लिहिणाऱ्या, या पाच लेखकांनी फुंकलेली तुतारी म्हणावी लागते. व्यापकपणे आधुनिक जगण्यातील खा-उ-जा संस्कृतीमुळे निर्माण झालेल्या स्थित्यंतरांना ही कथा सामोरी जाताना दिसत नाही. खा-उ-जा संस्कृतीशी निगडीत मर्यादित स्वरूपाचे आशयविश्व या कथाकारांच्या कथेतून व्यक्त होते. हे आशयविश्व पर्यटनव्यवसाय, कॅसिनो, खाण व्यवसाय, कंपन्या प्रस्थापित करण्यासाठी शेतजमिनीचे हस्तांतरण, जागेसाठी निर्माण झालेला भाऊबंदकीचा प्रश्न, परदेशी गेलेल्या ख्रिस्ती खलाशांच्या जीवनाची वाताहात, जुन्या नव्या पिढीमधील संघर्ष, चंगळवादी संस्कृती इत्यादी विषयांपुरते मर्यादित असलेले दिसून येते. मिलिंद म्हामल सोडले तर अन्य कथाकारांच्या एकूण कथालेखनाचा मुळात हेतूच खा-उ-जा संस्कृतीचे चित्रण करणे असेही म्हणणे अयोग्य ठरते. मिलिंद म्हामलांच्या कथेतील विश्व हे पर्यटननकेंद्री असल्याने खा-उ-जा संस्कृतीचे चित्रण करत असताना अनुभवविश्वातील तोचतोपणा लक्षात येतो. दयाराम पाडलोस्करांची कथा ग्रामीण जीवन, स्त्री व्यथा, सामाजिक प्रश्न अशा भिन्न आयामांना स्पर्श करते. 'बावळ' हा त्यांचा प्रकाशित झालेला शेवटचा कथा संग्रह. या संग्रहातील शेवटच्या 'वाऽऽऽ कितें ?' व 'घुसमट' या दोन कथा आशयविश्वाच्या वेगळ्या वाटा चोखाळताना दिसून येतात. नव्वदोत्तरी गोव्यातील वास्तवाला, बदलांना सामोरे जाणारे लेखक आपल्या कथा

लेखनाच्या आशयविश्वाची दिशा बदलत्या सांस्कृतिक, सामाजिक जीवनानुसार बदलत असल्याचे 'बावळ' या संग्रहाच्या शेवटी आलेल्या या दोन्ही कथांमधून सूचित करू पाहत असल्याचे दिसते व सुरूवातीच्या दोन दशकात नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेमध्ये खा-उ-जा संस्कृतीचे मर्यादित स्वरुपात व्यक्त झालेले अनुभवविश्व अधिक व्यापकतेने पुढील काळात निश्चितच बहरेल याची शाश्वती देतात.

**संदर्भ**

[1] शोभणे, रवींद्र. *जागतिकीकरण समाज आणि मराठी साहित्य*. विजय प्रकाशन, नागपूर. २०११. पृ. क्र. १०.

[2] शोभणे, रवींद्र. *जागतिकीकरण समाज आणि मराठी साहित्य*. विजय प्रकाशन, नागपूर. २०११. पृ. क्र.२४.

[3] गोखले, कैलाश., नंदकुमार कामत, नितेश उगवेकर. "Tourism and Socio-Cultural Implications A Study Of Selected Tourist Destination of South Goa District, Goa-India". *जर्नल ऑफ ह्युमॅनिटीज अँड सोशल सायन्स (IOSR-JHSS)* खंड १९. अंक १०. (ऑक्टो. २०१४). पृ. ३६.

[4] "4.03 Lakh Foreign Tourist Visits Goa During January-November 2023." *Press Information Bureau*, Ministry of Tourism, Government of India, 5 Feb. 2024, https://pib.gov.in/PressReleseDetailm.aspx?PRID=2002653.

[5] Nanjappa, Vicky. "Goa: How the Russian Drug Mafia Operates." *Rediff.com*, 10 Mar. 2008, https://www.rediff.com/news/2008/mar/10goa2.htm.

[6] Nanjapa, Vicky. "Goa: Drugs, Sex, and a Rs. 6K Crore Turnover." *Vicky Nanjapa*, 9 Nov. 2013, https://vickynanjapa.in/2013/11/09/goa-drugs-sex-and-a-rs-6k-crore-turnover

[7]Botelho, Afonso. "Casinos in Goa: The Challenge Ahead is to Implement Sustainable Strategies to Minimize Their Ill-Effects." *ResearchGate*, 2018, https://www.researchgate.net/publication/325673858_Casinos_in_Goa_The_Challenge_Ahead_is_to_Implement_Sustainable_Strategies_to_Minimize_Their_Ill-Effects/link/5b1ce38a0f7e9b68b42b5013/download.

[8] रसाळ, सुधीर. "संस्कृती आणि वाङ्मयनिर्मिती". *निवडक सुधीर रसाळ*. पृ. क्र. २१८.

[9] गांवस, विठ्ठल. *फिंगर बाऊल*. कैलाश पब्लिकेशन्स्, औरंगाबाद. पृ. क्र. २९.

[10] गांवस, विठ्ठल. *कॅथरीन*. गमभन प्रकाशन, १९९३. पृ. क्र. ३.

[11] म्हामल, मिलिंद. *आलकाण्याचो डोंगर*. स्वाती म्हामल, बारदेश – गोवा. २००८. पृ. ७.

[12] पाडलोस्कर, दयाराम. *बवाळ*. देवदया प्रकाशन, पेडणे – गोवा. २०२१. पृ. क्र. १५७.

[13] पाडलोस्कर, दयाराम. *बवाळ*. देवदया प्रकाशन, पेडणे – गोवा. २०२१. पृ. क्र. १६६.

[14] पाडलोस्कर, दयाराम. *बवाळ*. देवदया प्रकाशन, पेडणे – गोवा. २०२१. पृ. क्र. १६७.

[15] देसाई, गजानन. *कुळागर*. प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर. २००५. पृ. क्र. ८५.

[16] रसाळ, सुधीर. "संस्कृती आणि वाङ्मयनिर्मिती". *निवडक सुधीर रसाळ*. पृ. क्र. २१७.